रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

• वर्ष १७ • अंक ८१
www.ramprahar.com

सोमवार, ७ ऑक्टोबर २०२४ • पाने ८ • किंमत ₹२



पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मिडलक्लास सोसायटी मित्र मंडळ आयोजित झंकार नवरात्रोत्सवातील देवीचे भाजप नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांनी दर्शन घेतले. त्यांचे आमदार प्रशांत ठाकूर व सोसायटी मित्र मंडळाचे अध्यक्ष सुमित झुंझारराव यांनी स्वागत केले.

## अंतरंग

सौर कृषीपंप योजनेंतर्गत कृषीपंपाचे लोकार्पण/२

आमदार महेश बालदींच्या निधीतून चौकमध्ये विविध विकासकामे/५


ऐतिहासिक जंजिरा किल्ल्याचे दरवाजे अखेर खुले/७

# कळंबोली सर्कलचे विस्तारीकरण

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिली ७७०.४९ कोटींच्या खर्चाला मान्यता | आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांच्या मागणी, पाठपुराव्याला यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कळंबोली सर्कलच्या अद्ययावतीकरणाचा निर्णय घेण्यात आला आहे. याकरिता केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी ७७०.४९ कोटींच्या खर्चाला मान्यता दिली आहे. हा १५.५३ किलोमीटरचा एक महत्वपूर्ण पायाभूत प्रकल्प असून त्यामुळे कळंबोली जंक्शनची वाहतूक कोंडीतून आता कायमची सुटका होणार आहे. यासाठी लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी केलेली मागणी आणि पाठपुरावा कामी आला आहे.



कळंबोली सर्कलवर नेहमीच वाहनांची वर्दळ असते. मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली ते पनवेल-उरण-जवाहलाल नेहरू बंदराकडे जाणाऱ्या महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहनांची रहदारी असते. पनवेल-उरण ते मुंबई-ठाणेकडून हि वाहतूक जेएनपीटी कडे ये-जा होत असताना अवजड कंटेनर, प्रवासी वाहतूक कळंबोली एमजीएम सर्कल येथून येथून मार्गक्रमण करीत असते, त्यामुळे कळंबोली सर्कल हे ठिकाण रहदारीचे आणि महत्त्वाचे जंक्शन आहे.

या सर्व ठिकाणी, स्थलांतरित किंवा कंटेनर वाहतूक चोवीस तास चालू आहे आणि या कारणास्तव, वाहतूक कोंडीची समस्या नेहमीच परिसरात भेडसावते आणि त्यामुळे मोठ्या प्रमाणात इंधन आणि वेळ वाया जाते. त्याचबरोबर येथून धावणाऱ्या वाहनांची प्रचंड संख्या असल्याने कळंबोली येथे प्रचंड वाहतूक कोंडी होते व ती सुरळीत करण्यामध्ये पोलीसांचाही बराच वेळ खर्च होतो. त्यामुळे वाहतूक कोंडीतून प्रवाशांची मुक्तता करण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना विनंती केली होती व त्या संदर्भात पाठपुरावा केला होता.

दरम्यान, वाहतुकीच्या या दैनंदिन समस्येवर मार्ग काढून जनतेची वाहतूक खोळंब्यातून सुटका करण्यासाठी सर्व संबंधीतांच्या बैठका घेऊन उपाययोजना सुचविण्यात आल्या. (पान २ वर..)

### आंतरराष्ट्रीय दर्जाचा सल्लागार नियुक्त

कळंबोली वाहतूक सर्कल विकसित करण्यासाठी जेएनपीए, सिडको आणि राष्ट्रीय रस्ते विकास प्राधिकरणाने एकत्र येऊन प्रस्तावित नवी मुंबई विमानतळाच्या सीमाभागातील रस्ते विकसित करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. यामधील पॅकेज पाचमध्ये कळंबोली सर्कल आणि विमानतळाच्या बाजूकडील एक्झिटवर चक्राकार बेट तयार करण्याचे प्रस्तावित होते. या कामासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचा सल्लागार नियुक्त करण्यात आला आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी ७७०.४९ कोटींच्या खर्चाला मान्यता दिली आहे.

# चेंबूरमध्ये मध्यरात्री अग्नितांडव

### एकाच कुटुंबातील सात जणांचा होरपळून मृत्यू

**मुंबई : प्रतिनिधी**

चेंबूरच्या सिद्धार्थ कॉलनीतील पहाटे लागलेल्या आगीत एकाच कुटुंबातील सात जणांचा होरपळून मृत्यू झाला. मृतांमध्ये दोन चिमुकल्यांचादेखील समावेश आहे. दरम्यान, या आगीच्या दुर्घटनेतील मृतांच्या नातेवाईकांना पाच लाख रुपयांची मदत दिली जाईल तसेच जखमींवर शासनाच्या खर्चाने उपचार केले जातील, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.



चेंबूर येथील सिद्धार्थ कॉलनीच्या के. एन. गायकवाड मार्गावरील गांगुर्डे प्लॉट नंबर १६ येथील छेदिराम अलगुराम गुप्ता (७० वर्ष) यांच्या राहत्या घराला आग लागली. गुप्ता यांचे राहते घर १+२ पोटमाळ्याचे असून घराला तळमजल्यावर किराणा मालाचे दुकान होते. या दुकानामध्ये रॉकेलचे कॅन ठेवण्यात आले होते. महापालिकेने दिलेल्या माहितीनुसार, घराच्या मीटर बॉक्समध्ये शॉक सर्किटमुळे ही आग लागली आणि बघता बघता संपूर्ण घरात पसरली.

या आगीमध्ये एकाच कुटुंबातील सात जणांचा होरपळून मृत्यू झाला आहे. परिस गुप्ता (७), मंजू प्रेम गुप्ता (३०), अनिता प्रेम गुप्ता (३९), प्रेम गुप्ता (३०), नरेंद्र गुप्ता (१०), विधी गुप्ता (१५), गितादेवी गुप्ता (६०) अशी मृत व्यक्तींचे नावे आहेत.

मुख्यमंत्री शिंदे यांनी दुर्घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. यात त्यांनी दुर्दैवी कुटुंबियांची आस्थेने विचारपूस केली तसेच त्यांना सर्वतोपरी आधार देण्याचा दिलासा दिला.

या घटनेत गेल्या सत्तर वर्षापासून मुंबई चेंबूर भागात राहणारे गुप्ता यांचा धर्मदेव हा मुलगा वगळता सर्व कुटुंब आगीत जळून मृत्यूमुखी झाले. छेदिराम गुप्ता स्वतः जखमी असून पुढील उपचाराकरता राजावाडी रुग्णालयात दाखल आहेत. तर मुलगा धर्मदेवला उपचारानंतर सोडण्यात आले आहे.



**पनवेल : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयास एज्युकेशन टूडे यांच्या वतीने एक्सलन्स इन एज्युकेशनचा पुरस्कार मिळाला आहे. याबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विद्यालयाचे अभिनंदन व कौतुक केले.** (वृत्त पान २ वर..)

# कार आणि टेम्पोच्या भीषण अपघातात चार जणांचा मृत्यू

### नातेपुते-फलटण मार्गावरील घटना

**फलटण : प्रतिनिधी**

नातेपुते-फलटण राष्ट्रीय महामार्गावरील कारूंडे पुलाजवळ रविवारी (दि.६) सकाळी ६ वाजण्याच्यादरम्यान टेम्पो व कार यांच्यात भीषण धडक झाली. या अपघातात चार जणांचा मृत्यू झाला.



यामध्ये कारचालक राजेश अनिलकुमार शहा (वय ५४ वर्षे) दुर्गेश शंकर घोरपडे (वय २७) कोमल विशाल काळे (वय ३२) शिवराज विशाल काळे (वय १०) सर्व राहणार जंक्शन (ता.इंदापूर) यांचा अपघातात मृत्यू झाला. आकाश दादा लोंढे, अश्विनी दुर्गेश घोरपडे, सुरज लोंढे हे तीन व्यक्ती गंभीर जखमी झाले असुन, त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. जमखींना नातेपुते ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. राजेश शहा, दुर्गेश घोरपडे, कोमल काळे, विशाल काळे यांना डोक्यावर गंभीरपणे इजा होऊन रक्तस्त्राव झाल्यामुळे उपचारापूर्वीच मृत झाल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी घोषित केले.

## निवडक

### मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. भवाळकर



**पुणे :** लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीच्या ज्येष्ठ अभ्यासक-संशोधक डॉ. तारा भवाळकर यांची तब्बल सात दशकांनी दिल्ली येथे होत असलेल्या ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. साहित्य संमेलनाच्या इतिहासात हा बहुमान संपादन करणाऱ्या भवाळकर या सहाव्या महिला ठरल्या आहेत.

### टी-२० महिला विश्वचषकात भारताचा पाकिस्तानवर विजय

**दुबई :** टी-२० महिला विश्वचषक २०२४मध्ये भारताने पाकिस्तानचा सहा विकेट्सने पराभव करत पहिला विजय मिळवला आहे. सजना सजीवनने पहिल्याच चेंडूवर चौकार लगावत भारताने पाकिस्तानचा पराभव केला आहे. अरूंधती रेड्डिने १९ धावा देत तीन विकेट्स घेतल्याने तिला सामनावीराचा पुरस्कार मिळाला आहे.

# कळंबोलीमध्ये विविध विकासकामांचा धडाका

### आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते भूमिपूजन





**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या आमदार निधीतून आणि पनवेल महापालिकेच्या माध्यमातून विविध विकासकामांचा शुभारंभ रविवारी (दि. ६) कळंबोली येथे झाले. या कामाचे भूमिपूजन आमदार प्रशांत ठाकूर व पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते झाले.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, मी कळंबोलीतील सर्व नागरिकांचे, नगरसेवक, शहराध्यक्ष यांना मी धन्यवाद देतो, कारण एकाच वेळी आज जवळजवळ शंभर कोटींच्या कामांचे भूमिपूजन माझ्या हस्ते होत आहे, याचे सर्व श्रेय आपण केलेल्या पाठपुराव्याचे आहे. (पान २ वर..)

**'तुमची-आमची अस्मिता जपणारे महायुतीचे सरकार'**

*तुमची-आमची अस्मिता जपणारे महायुतीचे सरकार जे तुमच्या संसाराला मदत करते, विविध योजना तुमच्यासाठी केंद्र सरकार असू द्या किंवा राज्यात महायुतीचे सरकार असू द्या, नेहमीच आपल्या बरोबर राहिले आहे. पुढल्या काळात आपणही महायुतीच्या बाजूने कौल द्याल, असा विश्वास आमदार प्रशांत ठाकूर यांनी या कार्यक्रमावेळी व्यक्त केला.*

# खंडाळा घाटात बस जळून खाक

### सर्व प्रवासी सुखरूप

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावर खंडाळा घाटात रविवारी (दि.६) बेंगलोरहुन जयपुरला जाणाऱ्या खासगी बसला लायनर गरम झाल्याने अचानक आग लागली. बस पेट घेत असल्याचे चालक व वाहक यांच्या लक्षात आल्यानंतर बसमधील ३० प्रवाशांना ताबडतोब खाली उतरवण्यात आले.

चालक व क्लीनर यांच्यासह ३३ जण या बसमधून प्रवास करीत होते. कुठलीही जीवितहानी झाली नसली तरी प्रवाशांचे सामान मात्र आगीत जळून खाक झाले आहे. घटनेमुळे मुंबईकडे जाणाऱ्या वाहतुकीवर परिणाम झाला.



# कामोठे, कळंबोलीत रंगला खेळ पैठणीचा

### भाजपच्या कार्यक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींसाठी महायुती सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केल्यानंतर महिलांकडून सरकारच्या या योजनेचे स्वागत केले जात आहे आणि याच महिलांचे आशीर्वाद घेण्यासाठी पनवेल विधानसभा क्षेत्रातील सर्वच महिला भगिनींसाठी खेळ पैठणीचा आणि लकी ड्रॉ कार्यक्रमाचे आयोजन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वतीने करण्यात आले होते. कळंबोली व कामोठे येथे झालेल्या कार्यक्रमाला महिलांनी मोठी उपस्थिती लावली.




कामोठ येथे झालेल्या कार्यक्रमाला गोव्याचे माजी आमदार आणि पनवेल विधानसभा क्षेत्राचे निरीक्षक दयानंद सोपटे म्हणाले की, आमदार प्रशांत ठाकूर यांनी आरोग्याच्या संदर्भात असो किंवा शैक्षणिक, शिक्षणासंदर्भात असो मदतीचा हात सदैव देत असतात अशा माणसाच्या पाठीमागे आपण सर्वांनी ठामपणे उभा राहण्याची गरज आहे.

कामोठे सुषमा पाटील विद्यालयाच्या भव्य मैदानावर झालेल्या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर, गोव्याचे माजी आमदार आणि पनवेल विधानसभा निरीक्षक दयानंद सोपटे, कामोठे शहराध्यक्ष रवींद्र जोशी, माजी महापौर कविता चौतमोल, उपमहापौर चारुशीला घरत, कामोठे संपर्कप्रमुख प्रकाश बिनेदार, महिला सरचिटणीस संध्या शारबिंदे, सरचिटणीस हर्षवर्धन पाटील,माजी नगरसेविका राजश्री वाडेकर, माजी नगरसेवक विकास घरत, दिलीप पाटील, विजय चिपळेकर, गोपीनाथ भगत, प्रदीप भगत, डॉ. अरुणकुमार भगत, नगरसेविका कुसुम म्हात्रे, हेमलता गोवारी, पुष्पा कुत्तरवडे, हॅप्पी सिंग विद्या तामखेडे, महिला मोर्चा अध्यक्ष वनीता पाटील, युवा मोर्चा अध्यक्ष तेजस जाधव, मयूर मोहिते आदी उपस्थित होते.

कळंबोली येथे झालेल्या कार्यक्रमात लाडकी बहीण योजनेमध्ये लाभार्थी ठरलेल्या महिला बहिणींचे अभिनंदन आणि त्यांचा सन्मान करण्यात आला. (पान २ वर..)

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिलांसाठी सुरू केलेल्या विविध योजनांचा तुम्ही महिला बहिणी लाभ घेत आहात. अजूनसुद्धा जर काही महिलांना या योजनेचा लाभ मिळत नसेल किंवा या योजनेसंदर्भात काही अडचणी असतील तर भारतीय जनता पक्षाच्या आपल्या विभागाच्या कार्यकर्त्यांना भेटून या समस्या दूर करण्याचा प्रयत्न आम्ही नक्की करू.**
**-आमदार प्रशांत ठाकूर**

# माथेरान मिनीट्रेन मार्गाच्या कामांना वेग; लवकरच धावणार

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानची राणी अर्थात मिनिट्रेनची पावसाळी सुट्टी आता लवकरच संपणार असून हिवाळी पर्यटन हंगामासाठी पुन्हा नव्या दमाने ती रुळावर येणार आहे. येथील स्थानिक तसेच अबालवृद्ध पर्यटकांची आवडती आणि लाडकी नेरळ-माथेरान अशी नॅरोगेजवर चालणाऱ्या मिनिट्रेनच्या कामांच्या हालचालींना वेग आलेला दिसत आहे.

अमनलॉज स्थानक आणि वॉटर पाईप स्थानक या दरम्यान अंतिम टप्प्यातील कामे सुरू असून आता मिनिट्रेनच्या मार्गातील अडथळे दूर होत आहेत. येथील माथेरानच्या राणीची पावसाळी सुट्टी लवकरच संपणार असून प्रवाशांच्या सेवेत लवकरच मिनिट्रेन सुरू होईल असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

माथेरानच्या डोंगरात दरवर्षी मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो आणि त्यामुळे दरडी कोसळण्याच्या भीतीने ही नेरळ-माथेरान-नेरळ मिनिट्रेन दरवर्षी पावसाळी रजेवर जाते. यंदाच्या वर्षी ८ जून रोजी नेरळ-माथेरान-नेरळ मिनिट्रेन प्रवाशांकरीता पावसाळ्याचे चार महिने बंद करण्यात आली होती. माथेरान मिनीट्रेनचा २१ किलोमीटरचा घाट मार्ग मोकळा करून तो सुरक्षित असल्याचा अहवाल मध्य रेल्वेला सादर करावा लागतो. त्यानंतरच मिनिट्रेन सेवा सुरू केली जाते. या अनुषंगाने येथे मध्य रेल्वे कर्मचारी यांच्याकडून रेल्वे रुळांचे काम जलद गतीने सुरू आहे. (पान २ वर..)



# मागेल त्याला सौर कृषीपंप योजनेंतर्गत कृषिपंपाचे लोकार्पण

## मोफत वीज योजनेंतर्गत शेतकर्‍यांना वीजबिलांच्या पावतीचे वितरण

**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेंतर्गत शेतकर्‍यांना वीजबिलांच्या पावतीचे वितरण आणि मागेल त्याला सौर कृषीपंप योजनेंतर्गत आस्थापित कृषीपंपाचे लोकार्पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते रविवारी (दि.६) छत्रपती संभाजीनगर येथे झाले.




पालकमंत्री तथा अल्पसंख्याक विकास व औकाफ, पणन मंत्री अब्दुल सत्तार, गृहनिर्माण व इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, सिडकोचे अध्यक्ष संजय शिरसाट, खासदार भागवत कराड, आमदार सतीश चव्हाण, आमदार विक्रम काळे, आमदार प्रदीप जैस्वाल, आमदार रमेश बोरनारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेत राज्य सरकारने शेतकर्‍यांचे कृषीपंपाचे चालू बिल भरण्याचा निर्णय घेतल्यामुळे शेतकर्‍यांना मोफत वीज मिळत आहे. आगामी पाच वर्षे सरकार शेतकर्‍यांचे साडेसात एचपीपर्यंतच्या पंपांचे चालू बिल भरेल असा शासन निर्णय जारी झाला आहे. राज्यातील ४४ लाख शेतकर्‍यांना याचा लाभ होणार आहे. सरकारने एप्रिल ते जून या कालावधीच्या बिलापोटी २७५० कोटी रुपये महावितरणला अदा केल्यामुळे शेतकर्‍यांना महावितरणकडून पावत्या पाठविण्यात येत आहेत.

या कार्यक्रमात मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते शेतकर्‍यांना प्रातिनिधिक स्वरुपात पावत्या प्रदान करण्यात आल्या. शेतकर्‍यांना मोफत वीज देण्याच्या या योजनेत राज्य सरकार कृषीपंपांचे चालू बिल भरत आहे. मुख्यमंत्री तसेच उपमुख्यमंत्र्यांनी राज्य सरकारच्या वतीने शेतकर्‍यांच्या वीज बिलापोटी प्रतिकात्मक धनादेश महावितरणला सुपूर्द केला. महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी हा धनादेश स्वीकारला. या वेळी अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला उपस्थित होत्या.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मागेल त्याला सौर कृषी पंप या योजनेत राज्यातील शेतकर्‍यांना दहा लाख पंप देण्यात येणार आहेत. केवळ दहा टक्के रक्कम भरून शेतकर्‍यांना सौर ऊर्जा निर्मिती पॅनल्स आणि कृषीपंप मिळणार आहे. अनुसूचित जाती व जमातींच्या शेतकर्‍यांना लाभार्थी हिस्सा केवळ पाच टक्के भरावा लागेल. ऊर्वरित रक्कम केंद्र आणि राज्य सरकारकडून अनुदान म्हणून मिळते. शेतकर्‍यांना स्वतंत्र आणि हक्काचे सिंचनाचे साधन सौर कृषीपंपामुळे मिळणार आहे. यामुळे शेतकर्‍यांना २५ वर्षे वीजबिल नाही. पाच वर्षांत पंप बिघडला तर दुरूस्त करून मिळणार आहे. येत्या १८ महिन्यांत शेतकर्‍यांची सर्व वीज सौरऊर्जेद्वारे पुरवली जाणार आहे. त्यासाठी पहिली कृषा ऊर्जा कंपनी स्थापन करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, राज्य सरकार पुढील पाच वर्षे शेतकर्‍यांचे वीजबिल भरणार आहे. त्यासाठी सरकारने निधी दिला आहे. शेतकर्‍यांना आता शून्य वीजबिले पाठवली जात आहेत.

या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते अर्जदारांना अर्ज मंजुरीचे व अनुदानाचे एसएमएस पाठविण्यात आले, तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बटण दाबून आतापर्यंत शेतात बसविलेले ६०,००० सौर कृषीपंप रिमोटद्वारे चालू करून योजनेचे लोकार्पण केले.

# प्रतापगडाच्या संवर्धनाचे ‘युनेस्को’कडून कौतुक


**सातारा : प्रतिनिधी**

किल्ले प्रतापगडाला ‘युनेस्को’च्या पथकाने रविवारी (दि.६) भेट दिली. या पथकाने किल्ल्यावरील दरवाजा, मुख्य बुरुज, चोरवाटा, तलाव, मंदिर तटबंदी व अन्य संवर्धनाच्या कामांची पाहणी केली. ३५० वर्षांनंतरही प्रतापगडाची योग्य ती जपणूक केल्याबद्दल, तसेच सणउत्सवाची परंपरा अबाधित ठेवल्याबद्दल युनेस्कोच्या पथकाने सेवेकऱ्यांचे भरभरून कौतुकही केले.

महाराष्ट्रातील अकरा व तमिळनाडूतील जिंजी किल्ल्याचा समावेश जागतिक वारसास्थळ यादीत करावा, असा प्रस्ताव केंद्र सरकारने ‘युनेस्को’ला पाठविला आहे. या यादीत किल्ले प्रतापगडाचा समावेश आहे. या किल्ल्याची पाहणी करण्यासाठी ‘युनेस्को’चे पथक पुणे जिल्ह्याचा दौरा आटोपून साताऱ्यात आले. सकाळी हे पथक किल्ल्यावर दाखल झाले. या वेळी दिल्ली व महाराष्ट्र पुरातत्त्व विभागाचे अधिकारी उपस्थित होते. किल्ल्यावरील ऐतिहासिक वास्तूंची पथकाने बारकाईने पाहणी करताना माहितीही जाणून घेतली. त्यानंतर पथकातील अधिकाऱ्यांनी स्थानिक किल्लेदार, पालखीचे भोई, मंदिराचे सेवेकरी, तसेच तरुणांशी संवाद साधून त्यांना काही प्रश्नही विचारले. या प्रश्नांना सर्वांनी समर्पक उत्तरे दिली.

साडेतीनशे वर्षांनंतरही भक्कम असलेली किल्ल्याची तटबंदी, तसेच सेवेकऱ्यांनी अबाधित ठेवलेली सण-उत्सवाची परंपरा याचे ‘युनेस्को’च्या पथकाने कौतुक केले. किल्ल्याच्या पायथ्याशी असलेली अफझल खान कबर आणि परिसराचीदेखील या पथकाने पाहणी केली.

प्रतापगडाचा दौरा आटोपून या पथकाने साताऱ्यातील छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालयाला भेट देऊन येथील बारा किल्ल्यांच्या प्रतिकृतीची पाहणी केली. वाघनखांच्या दालनालाही या पथकाने भेट दिली.



# पाली भाषेला अभिजात दर्जा दिल्याबद्दल भिक्खू संघाकडून पंतप्रधानांचे आभार

**रायगड : रामप्रहर वृत्त**

विश्वातील सर्वात पुरातन तसेच भगवान गौतम बुद्ध यांच्या काळापासून प्रसिद्ध असलेल्या पाली भाषेला केंद्र सरकारने अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल मुंबईतील बीकेसी येथे ऑल इंडिया भिक्खू संघाकडून पंतप्रधान नरेंद्र मोदीजींना पंचशीलाचा गमचा घालून व गौतम बुद्धांची प्रतिमा देऊन आभार व्यक्त करण्यात आले.



या वेळी भिक्खू संघासोबत त्यांनी बुद्धवंदना कथन केली. भिक्खू संघाबरोबर संवाद साधताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, पाली भाषेचा बुद्ध धर्मासोबत खूपच घट्ट नाते आहे. येत्या काळात अधिकाधिक तरूण पिढी पाली भाषेविषयी ज्ञान मिळवतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या वेळी माजी मंत्री आमदार विजय गिरकर, ऑल इंडिया भिक्खू संघाचे अध्यक्ष भदंत राहुल बोधी महाथेरो, मुंबईचे अध्यक्ष भदंत शांतीरत्न महाथेरो, भदंत राबसेल लामा, भदंत बिमल चकमा, भदंत संतोष चकमा उपस्थित होते.

# मच्छीमारी नौका बुडून दोन खलाशांचा मृत्यू

**वेंगुर्ले :** तालुक्यातील निवती समुद्रात मासेमारी करून येणारी बोट उलटून दोन मच्छिमारांचा बुडून मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी मध्यरात्री १.४५ वा. च्या सुमारास घडली. आनंद पुंडलिक पराडकर (५२, रा. कोचरा श्रीरामवाडी) आणि रघुनाथ धर्माजी येरागी (४९, रा. खवणे मधलीवाडी) अशी मृतांची नावे आहेत.

निवती येथील मच्छिमार अनिता आनंद धुरी यांची ‘धनलक्ष्मी’ ही मच्छीमारी बोट १४ खलाशांना घेऊन समुद्रात मच्छिमारीसाठी गेली होते. मध्यरात्री निवती समुद्रातून ही बोट परतीचा प्रवास करत असताना ती पलटी झाली. या वेळी मच्छिमारीसाठी वापरली जाणारी गिलनेट जाळी दोघांच्या अंगावर पडल्याने त्यात गुरफटून त्यांचा जागीच मृत्यू झाला. किनाऱ्यापासून जवळच असलेल्या म्हणजेच ज्या ठिकाणी समुद्र आणि खाडी एकत्र येते त्या ठिकाणी किनाऱ्यापासून २०० मीटर अंतर असताना ही दुर्घटना घडली. सुदैवाने १२ खलाशी पोहून किनाऱ्यावर आले.

# अबोली महिला रिक्षा संघटनेच्या महिलांसाठी आरोग्य शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अबोली महिला रिक्षाचालक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संतोष भगत यांनी नायर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या सहकार्याने रिक्षा चालक महिलांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन नवीन पनवेल येथे करण्यात आले होते.



यामध्ये डोळे तपासणीबरोबरच ब्लडप्रेशर, मधुमेह तपासणी अशा चाचण्या करण्यात आल्या. या शिबीराचा लाभ ३० महिला रिक्षा चालकांनी घेतला. हे शिबिर नवदृष्टी आय केअर सेंटर येथे घेण्यात आले.

या शिबिरासाठी या हॉस्पिटलचे मुख्य डॉ. संतोष कुमार नायर, डॉ. विजयश्री पाटील, डॉ. निकीता भोसले, डॉ. अश्वथी पोनोली यांचे विशेष सहकार्य लाभले. या वेळी महिलांना डोळयांच्या समस्या भेडसावत असतील तर आर्थिक दुर्बल महिलांसाठी मोफत ऑपरेशनही करण्यात येईल, असे डॉ. संतोष नायर यांनी सांगितले. या शिबिराला अबोली महिला रिक्षा संघटनेच्या सदस्या व पदाधिकारी उपस्थित होते.



**उरण : जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या टाकेदेवी मंदिरात सुरू असलेल्या नवरात्रोत्सवानिमित्त भाविकांच्या सेवेसाठी आमदार महेश बालदी यांनी मोफत चहा-पाण्याची व्यवस्था करून दिली आहे. भाविकांना याचा मोठ्या प्रमाणात फायदा होत असून भाविकांकडून आमदार महेश बालदी यांचे आभार मानले जात आहेत.**

# मंगळसूत्र खेचून चोरटे पसार

**पनवेल : वार्ताहर**

दुचाकीवरून आलेल्या चोरांनी ५४ वर्षीय महिलेच्या गळ्यातील आठ ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र खेचून पळून गेले. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.




अंजली सक्सेना या खारघर, सेक्टर ४ येथे राहत असून त्या आणि त्यांचे पती हे प्रशांत कॉर्नर, सेक्टर ३५ येथे मिठाई आणण्यासाठी गेले होते. टाटा मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटल येथे झाडाच्या नर्सरीजवळ आले असता एका दुचाकीवरून दोघे चोरटे पाठीमागून येऊन मागे बसलेल्या चोरट्याने सक्सेना यांच्या गळ्यातील मंगळसूत्र खेचून ते पळून गेले. याबाबत खारघर पोलीस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# खारघरच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयास पुरस्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयास एज्युकेशन टूडे यांच्या वतीने सर्वांगिण शिक्षण या निकषावर एक्सलन्स इन एज्युकेशनचा पुरस्कार मिळाला आहे. याबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विद्यालयाचे अभिनंदन व कौतुक केले.

एज्युकेशन टूडे यांच्या वतीने दिला जाणारा महाराष्ट्र स्कूल मेरिट अवॉर्ड रिअवॉर्डिंग २०२४-२५ हा एक्सलन्स इन एज्युकेशन पुरस्कार सर्वांगीण शिक्षण या निकषावर हॉलिस्टिक एज्युकेशनचा पुरस्कार शुक्रवारी देण्यात आला. पुरस्कार वितरण सोहळा मुंबई सहारा विमानतळ, अंधेरी पूर्व येथील ललित या पंचतारांकित हॉटेलमध्ये थाटात झाला.

रामशेठ ठाकूर विद्यालयाने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासासाठी केलेल्या प्रयत्नांचे हे एक फलित आहे. रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांचा शैक्षणिक, मानसिक, सामाजिक, भावनिक आणि शारीरिक विकास यांचा विचार करून शिक्षण दिले जाते आणि याचेच फलस्वरूप म्हणून एज्युकेशन या श्रेणीत यशाबद्दल विद्यालयास हॉलिस्टिक पुरस्कार मिळाला. याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी प्राचार्या निशा नायर यांचे अभिनंदन व कौतुक केले.

या वेळी माजी उपमहापौर सीताताई पाटील रयत शिक्षण संस्थेचे रायगड विभागाचे पीआरओ कारंडे सर, शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल उलव्याच्या मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर, निशा नायर, सहाय्यक शिक्षक डॉ. सुहास धनवे, महेंद्र पाटील, नंदकुमार भोईर, सहाय्यक क्रीडा शिक्षक प्रवीण पाटील, स्नेहा ठाकूर आदी उपस्थित होते. या वेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यालयाने उत्तरोत्तर प्रगती करावी, अशी अपेक्षा या वेळी व्यक्त केली.

पान १ वरुन

## कळंबोली सर्कलचे विस्तारीकरण

त्या अनुषंगाने नामदार नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली कळंबोली जंक्शन येथील वाहतुक समस्येवर वाहतुकीमध्ये काही भरीव बदल करण्याचा आराखडा तयार करण्यात आला. या कामाची लवकरच निविदा प्रक्रिया होणार होऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे.

उर्वरित महाराष्ट्राला जोडणारा कळंबोली सर्कल हा महत्त्वाचा दुवा आहे. या सर्कलच्या विस्तारीकरणाला नितीन गडकरी यांनी हिरवा कंदील दाखवला आहे. त्यामुळे वाहनचालकांचे इंधन आणि वेळेची बचत होणार आहे. या विकासकामासाठी होणाऱ्या खर्चाला मान्यता दिल्याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी नामदार नितीन गडकरी यांचे आभार व्यक्त केले आहेत.

## कळंबोलीमध्ये विविध विकासकामांचा धडाका

कळंबोली शहरातील प्रभाग क्रमांक १० मधील अंतर्गत रस्ते फुटपात आणि गणेश मंदिराच्या बाजूच्या मोकळ्या जागेचे काँक्रिटीकरण आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निधीतून होणार आहे, तर कळंबोली प्रभाग क्रमांक १० मधील सुधागड हायस्कूल ते काळभैरव मंगल कार्यालय सेक्टर १ येथील रस्त्याचे डांबरीकरण, सुधागड स्कूल ते सत्यसंस्कार सोसायटी, सत्यसंस्कार सोसायटी ते तिरुपती सोसायटी येथील रस्त्याचे डांबरीकरण, तिरुपती सोसायटी ते शिवप्लाझा सोसायटी पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण, बिकानेर स्वीट होम ते कळंबोली पोलीस स्टेशनपर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण, सेक्टर १ बिकानेर स्वीट होम ते हनुमान मंदिर, हनुमान मंदिर ते सेंट जोसेफ हायस्कूल, के एल कॉलेज ते हनुमान मंदिर आणि हनुमान मंदिर ते मायेक्का मंदिर, शंकर मंदिर ते सेंट जोसेफ हायस्कूल, सेंट जोसेफ हायस्कूल ते साई बाबा मंदिर सेक्टर २, गणेश मंदिर समोरील पूर्ण रस्ता विठ्ठल मंदिर ते सप्तशृंगी मंदिर रस्ता अशा प्रभाग क्रमांक दहा मधील सर्वच रस्त्यांचे डांबरीकरण भूमिपूजनाचा शुभारंभ आमदार प्रशांत ठाकूर आणि सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

या भूमिपूजन सोहळ्याला कळंबोली शहराध्यक्ष रविनाथ पाटील, पनवेल महापालिका माजी सभापती मोनिका महानवर, माजी नगरसेविका प्रमिला पाटील, रामा महानवर, अशोक मोटे, प्रकाश शेलार, दिलीप बेस आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## कामोठे, कळंबोलीत रंगला खेळ पैठणीचा

या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर, गोव्याचे माजी आमदार पनवेल विधानसभा प्रभारी दयानंद सोपटे, माजी महापौर कविता चौतमोल, माजी सभागृह येथे परेश ठाकूर, माजी उपमहापौर चारुशीला घरत, शहराध्यक्ष रवीनाथ पाटील, जिल्हा सरचिटणीस संध्या शारबिंद्रे, माजी नगरसेविका राजश्री वावेकर, मोनिका महानवर, प्रमिला पाटील, माजी नगरसेवक अमर पाटील, बबन मुकादम, राजेंद्र शर्मा, अशोक मोटेयांच्यासह महिला बहिणी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## माथेरान मिनीट्रेन मार्गाच्या कामांना वेग; लवकरच धावणार

माथेरान टॅक्सी स्टँड जवळील अमनलॉज स्थानक ते माथेरान रेल्वे स्थानकापर्यंत रेल्वे रुळालगत असलेली माती आणि पेव्हर ब्लॉक काढून रेल्वेरूळ सुस्थितीत आणण्यासाठी कामे प्रगतीपथावर सुरू आहेत. जलद गतीने कामे पूर्ण करून मिनीट्रेनच्या मार्गात असलेली अडथळे दूर केली जात आहेत. येथे पावसाळी सुट्टीवर गेलेली माथेरानची राणी अर्थात मिनिट्रेन लवकरच येथे प्रवाशांच्या सेवेसाठी उपलब्ध होईल अशी आशा व्यक्त केली जात आहे.

# डेरवली गावातील रस्ता होणार सुस्साट!

## भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते काँक्रीटीकरणाचे भूमिपूजन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांच्या माध्यमातून मतदारसंघात विविध भूमिपूजन आणि उद्घाटनांचा धडाका पहायला मिळत आहे. मतदारसंघातील डेरवली गावातील श्री स्वामी समर्थ नगरी ते सिल्व्हर अपार्टमेंट येथील रस्त्याच्या काँक्रीटीकरणाच्या कामाचे भूमिपूजन रविवारी (दि.६) भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले.

या वेळी उपाध्यक्ष राजेंद्र पाटील, पंचायत समितीचे माजी सदस्य भूपेंद्र पाटील, ओम एकदंत सोसायटीचे, नवनाथ भोसले, दीपक भोसले, बाबाजी पावडे, संपत भोसले, संतोष पावडे, कोंडीभाऊ भोसले, भाऊ भोसले, नरेश भोसले, प्रतीक जगदाळे, नाना सोबले, योगेश शेरकर, हनुमंत भोसले, गोरक्षनाथ थोरात, दत्ता थोरात, सुषमा जगदाळे, पूजा भोसले, राधिका पाटील, पुनम भोसले, मनीषा भोसले, सुरेखा भोसले, सायली जाधव, शशिकला थोरात, कमल भोसले, लोकेश गोसावी, रवींद्र शेळके, महेश शेंडे, सुरेश पाटील, अतुल भोईर, शैलेश शेंडे, नितीन म्हात्रे, दीपक म्हात्रे, संतोष गाथारे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

उपाध्यक्ष राजेंद्र पाटील यांनी, पनवेल विधानसभा मतदारसंघात गेली १५ वर्षे आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेल्या विकासकामांचा झंजावात आम्ही डोळ्यादेखत पाहत होतो, परंतु आम्ही ज्या मतदारसंघांमध्ये राहतो त्या उरण मतदारसंघाच्या शिवसेना आणि शेकापच्या माजी आमदारांनी कोणत्याच पद्धतीचा विकास या मतदारसंघामध्ये केला नव्हता. २०१९साली आमदार महेश बालदी या मतदारसंघातून निवडून आले आणि तेव्हापासून या मतदारसंघांमध्ये विकासाचा झंजावात सुरू झाला. आज डेरिवली गावात १६ लाखांच्या रस्त्याच्या काँक्रीटीकरणाचे काम सुरू होत आहे. पुढल्या काळात आपल्या गावात अजून कोट्यवधींची कामे आमदार महेश बालदी यांच्या माध्यमातून होतील, असा विश्वास व्यक्त केला.

# बीसीटी विधी महाविद्यालयात पदवी वितरण सोहळा उत्साहात

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेल्या जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या भागूबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालयामध्ये तीन वर्षांच्या एलएलबी व पाच वर्षांच्या बीएलएस एलएलबी अभ्यासक्रमाचा पदवी वितरण सोहळा उत्साहात पार पडला.

ॲड. आदिश अग्रवाल आणि मुंबई विद्यापीठाच्या प्रमुख अतिथी डॉ.अलका पाटील यांच्यासह संस्थेचे अध्यक्ष रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या वेळी संस्थेचे उपाध्यक्ष वाय. टी. देशमुख, सचिव एस. टी. गडदे, सीडीसी सदस्य अर्चना ठाकूर, माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, विनायक कोळी, गणेश कोळी आदी उपस्थित होते.

प्राचार्य सानवी देशमुख व बीएलएलबी को-ऑर्डिनेटर धनश्री कदम यांच्या मार्गदर्शनाखाली आनम मेहंदीकर यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले आणि कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अपराजिता गुप्ता यांनी केले.

डॉ. आदिश अग्रवाल यांनी आपल्या शब्दांनी पदवीधरांना प्रेरणा देत न्याय आणि सामाजिक जबाबदारी जोपासण्यासाठी विधी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. डॉ. अलका पाटील यांनी समाजातील वकिलांच्या भूमिकेवर प्रकाश टाकला.

या समारंभात पदवीधर विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वाचा गौरव करण्यात आला आणि त्यांच्या शैक्षणिक वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा गाठला गेला. पदवीधरांनी दाखवलेल्या मेहनतीचे आणि समर्पणाचे कौतुक करण्यासाठी कुटुंबीय, शिक्षक आणि मित्रमंडळी एकत्र आली.





**पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेल्या विकासकामांच्या सन्मानार्थ भाजप युवा मोर्चाच्या वतीने भव्य बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. चिंध्रण, कुत्तरपाडा, मोहोदर, शिरवली आंबे, चिंचवली, महाळुंगे, मोरबे, कोंडले खैरवाडी, खानाव, वाकडी, हरिग्राम, उमरोली, उसर्ली, भानघर या विभागात रॅली काढण्यात आली. भाजपचे नेते एकनाथ देशेकर, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष कमला देशेकर, वाकडीचे माजी सरपंच नरेश पाटील, युवा मोर्चा अध्यक्ष आनंद ढवळे, उपाध्यक्ष विश्वास म्हात्रे, धनंजय पाटील, अध्यक्ष दीपक रिकामे, लहू मुंडे यांच्यासह युवा मोर्चाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

## केळवणेमध्ये जुगाऱ्यांवर कारवाई

**पनवेल** : तीन पत्त्यांचा जुगार खेळणाऱ्यांवर तालुका पोलिसांनी कारवाई करीत गुन्हा दाखल केला. त्यांच्याकडून २२ हजार ८०० रुपये जप्त करण्यात आले. केळवणे गाव प्राथमिक शाळेच्या मागे एका घरामध्ये काही जण जुगार खेळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकला. काही जण पळून जाण्याचा प्रयत्न करू लागले. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले व त्यांच्याकडे २२ हजार ८०० रुपये सापडले. याप्रकरणी तालुका पोलीस अधिक तपास करीत आहेत.



**पनवेल : गुळसुंदे येथील अभिनव सामाजिक विकास मंडळाच्या वतीने आयोजित नवरात्रोत्सवाला उरण विधानसभा मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार महेश बालदी यांनी भेट देऊन दुर्गामातेचे दर्शन घेतले. या वेळी त्यांचे मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला.**



## संपादकीय

# भाजप महायुतीचा शंखनाद

महाराष्ट्राच्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्याचा दौरा करून भाजप महायुतीमध्ये नवचैतन्य निर्माण केले. पंतप्रधानांनी विकासावर भर देतानाच विरोधक विकासात कसा अडथळा आणत आहेत याचाही उहापोह करून शाब्दिक जोडे लगावले.

**सलग तिसऱ्यांदा एनडीए अर्थात राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे नेते म्हणून देशाचे नेतृत्व करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक दिवसाचा धावता दौरा केला. यामध्ये त्यांनी पोहरादेवी (जि. वाशिम), ठाणे आणि मुंबईत वेगवेगळ्या कार्यक्रमांना उपस्थित राहून विविध विकास प्रकल्पांचा शुभारंभ आणि उपस्थितांना मार्गदर्शन केले. पंतप्रधान मोदी हे विकासपुरुष म्हणून ओळखले जातात. त्यांनी या दौऱ्यात ५६,१०० कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांचा होणार शुभारंभ केला. यामध्ये भूमिपूजन, उद्घाटन, लोकार्पण करण्यात आले. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांना सक्षम बनवण्याच्या आपल्या वचनबद्धतेनुसार पंतप्रधानांनी सुमारे ९.४ कोटी शेतकऱ्यांना सुमारे २० हजार कोटी रुपयांचा पीएम किसान सन्मान निधीचा ३.४५ लाख कोटींचा १८वा हप्ता यावेळी वितरित करण्यात आला. प्रधानमंत्री नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेच्या सुमारे दोन हजार कोटी रुपयांच्या पाचव्या हप्त्याचेही वितरणदेखील करण्यात आले. सर्वप्रथम पोहरादेवी येथे बंजारा विरासत संग्रहालयाचे उद्घाटन आणि किसान सन्मान संमेलन पंतप्रधान मोदींच्या हस्ते झाले. या वेळी २३ हजार ३०० कोटी रुपये खर्चाच्या कृषी आणि पशुसंवर्धन क्षेत्राशी संबंधित अनेक उपक्रमांचा शुभारंभदेखील पंतप्रधानांच्या हस्ते करण्यात आला. ठाण्यात आल्यानंतर त्यांनी उपस्थित जनतेशी मराठीतून संवाद साधला. आज एक मोठी आनंदाची बातमी घेऊन मी महाराष्ट्रात आलो आहे. केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. हा केवळ मराठी आणि महाराष्ट्राचा सन्मान नाही, तर या परंपरेचा सन्मान आहे, ज्यांनी देशाला ज्ञान, दर्शन आणि अध्यात्म आणि साहित्याची समृद्ध संस्कृती दिली आहे, असे पंतप्रधान आपल्या भाषणात म्हणाले. वाशिम आणि ठाणे येथे पंतप्रधानांनी काँग्रेससह महाविकास आघाडीवर हल्ला चढवला. स्वातंत्र्यानंतर काँग्रेसने बंजारा व अन्य मागास समाजांना कसे मागेच ठेवले. त्यांची उन्नती केली नाही, हे पंतप्रधानांनी सांगितले. त्याचप्रमाणे आम्हाला विकास कारायचा आहे आणि याआधी काँग्रेसने केलेल्या खड्ड्यांनाही भरायचे आहे, असा टोला विरोधकांना लगावला. एकीकडे कोल्हापुरात आलेले काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केवळ विरोध आणि टीका–टिपण्णीचा सूर आळवत भाजपला लक्ष्य केले. दुसरीकडे पंतप्रधान मोदींनी मात्र विकासावर आपला भर ठेवला. त्याचवेळी विरोधकांच्या चुकांवर बोट ठेवत त्यांना आपल्या खास शैलीत सुनावले. यानंतर मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याबद्दल मुंबईत आयोजित कार्यक्रमात पंतप्रधानांनी मराठी भाषेची महती कथन केली आणि उपस्थितांची मने जिंकली. अशा प्रकारे शनिवारचा दिवस पंतप्रधान मोदींनी अक्षरश: गाजवला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजितदादा पवार यांनी त्यांचा यथोचित स्वागत केले आणि त्यांच्या कार्याचा गौरव केला. पंतप्रधानांनीही मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना महाराष्ट्रात अत्यंत यशस्वी होत आहे याबद्दल समाधान व्यक्त करून नवरात्रीच्या काळात एकापाठोपाठ एक अनेक विकासकामांची उद्घाटने आणि पायाभरणी करण्याचे सौभाग्य मला मिळत आहे असे सांगत कृतज्ञता व्यक्त केली. येत्या काळातही विकासाचे हे चक्र अविरत सुरू राहणार हे निश्चित!**

# नागरिकांच्या सहभागाने चोरीच्या घटनांना आळा



## खबरबात
### विजय मांडे



कर्जत तालुक्यात विशेषतः शहरी भागात म्हणजे कर्जत शहर आणि नेरळ शहरामध्ये सातत्याने चोरीच्या घटना घडत आहेत. मग ती दुकान फोडी असो, मंगळसूत्र खेचून नेणे असो, घरफोडी असो किंवा जनावरांची चोरी असो या घटना वारंवार होतच असतात. अनेक वर्षे तालुक्यात दरोड्याचा घटना झाल्या नाहीत, मात्र अन्य चोऱ्या सुरूच आहेत. अर्थात त्याच्या बंदोबस्तासाठी पोलीस यंत्रणा कमीच पडणार कारण कर्जत आणि नेरळ पोलिस ठाण्यात मनुष्यबळ कमी आहे. त्यामुळे नागरिकांच्या सहभागा शिवाय चोरीच्या घटनांना आळा बसणार नाही. हे कटू सत्य आहे.

९० च्या दशकाच्या मध्यंतरी चोरीच्या घटना वाढल्या होत्या. त्यावेळी ग्रामस्थांनी गस्त घालण्यास सुरुवात केली होती. त्यावेळी लोकसंख्या कमी असल्याने प्रत्येकाला दिवसाआड गस्तीसाठी जावे लागत असे. प्रत्येक गावात ग्रामस्थांची गस्ती पथके होती. पोलीस ठाण्यांकडून 'पोलीस मित्र' अशी ओळखपत्र गस्त घालणाऱ्यांना देण्यात आली होती.

कर्जत शहरात वाड्यांच्या इमारती झाल्या. एका वाड्यात एका कुटुंबाऐवजी इमारत झाल्याने ४० – ५० कुटुंबे आली. त्यामुळे चोऱ्याही वाढल्या आहेत. कर्जत हे महत्वाचे रेल्वे स्थानक असल्याने अगदी रात्रभर प्रवासी सेवा सुरू असते त्यामुळे चोर चोरी करून लगेचच लोकल किंवा एक्सप्रेस पकडून पळून जातात आणि पोलिसांना तपास करणे अवघड होऊन बसते. तीस – बत्तीस वर्षांपूर्वी दरोडे पडत असत. असाच दरोडा १९९२ साली कडाव मध्ये पडला होता. त्यावेळी श्री बाल दिगंबर देवस्थानचे अध्यक्ष भालचंद्र तथा भाऊ उपाध्ये आणि कडवमधील मोठे व्यापारी शंकर भोपतराव यांच्या घरावर एकाच रात्रीत घरातील पुरुषांवर हल्ला करून त्यांना गंभीररीत्या जखमी करून लाखोंचा ऐवज दरोडेखोरांनी चोरून नेला होता. या दोन्ही व्यक्ती दहा – पंधरा वर्षांपूर्वी स्वर्गवासी झाल्या तरी त्या दरोडेखोरांचा तपास अद्याप लागला नाही. विशेष म्हणजे उपाध्ये यांचा एक सुपुत्र सैन्यात होता. त्यानेही अगदी वरच्या पातळीवरून तपास व्हावा यासाठी पत्र व्यवहार केला होता. त्याचाही काही उपयोग झाला नाही. एक गोष्ट आहे त्यानंतर तालुक्यात दरोडा पडल्याच्या घटना घडल्या नाही असे नाही. कर्जत शहरातील अतुल झुंजारराव यांच्या घरी सुद्धा दरोड्यासारखाच प्रकार झाला होता. त्यावेळी त्यांच्या वडिलांना मारहाण केली होती. त्यामुळे ते गंभीर जखमी झाले होते.

चोऱ्यांचे प्रकार वेगवेगळे आहेत. घरात कुणी नसताना घरफोडी करण्याचे प्रमाण जास्त आहे. रात्रीच्या वेळी दुकानांचे शटर कटावणीने किंवा जॅकने उचकटून चोरी करण्याचे प्रकार होत असतात. दुकान फोडीत जास्त ऐवज जात नाही. सुटी नाणी किंवा किरकोळ रकमेची चोरी होते. मात्र उचकटलेले शटर दुरुस्त करण्यासाठीचा खर्च चोरीच्या रकमेच्या दहा – वीस पट येतो. या चोऱ्या सी सी टीव्ही कॅमेरात कैद होत असतात. मात्र त्याचा तपास कधीच पूर्ण होत नाही. हे कटू सत्य आहे. कत्तलीसाठी चोरून नेणाऱ्या जनावरांच्या घटना सर्रास घडत आहेत. अनेक वेळा विश्व हिंदु परिषदेच्या कार्यकर्त्यांनी किंवा पशुप्रेमींनी या चोरांना पकडून पोलिसांच्या हवाली केले आहे. या चोऱ्या पकडल्यामुळे माहीत झाल्या, परंतु अशा किती तरी जनावरांना कत्तल खान्यात नेण्यात येते याची निश्चितच गणती नसावी. कोतवाल नगर मध्ये राहणारे नरेंद्र झुंजारराव यांच्या घरात सन १९९५ – ९६ मध्ये मध्यरात्रीच्या सुमारास सहा – सात जण दरोडा टाकण्याच्या इराद्याने शिरले. त्यावेळी झुंजारराव यांच्या पत्नी व अतुल, अजय, आशिष असे सर्व कुटुंबीय घरी होते. नरेंद्र यांना काही तरी गडबड असल्याचे लक्षात आले. त्यामुळे ते उठले व बाहेर आले. तितक्यात एकाने चापरने त्यांच्या डोक्यावर घाव घातला ते रक्तबंबाळ होऊन खाली पडले. तसेच चोरट्यांनी अजय व आशिषला सुद्धा मारहाण करून जखमी केले. त्याच वेळी त्या इमारतीतील असिफ मिर्झा, राजन पतंगे, सकपाळ हे रहिवाशी आपली दारे उघडून बाहेर आले. त्यांनी ते दृश्य बघताच आरडा – ओरडा केल्याने ते दरोडेखोर पळून गेले.

अलीकडेच म्हणजे ऑगस्ट २०१८ मध्ये एक विचित्र दरोड्याची घटना किरवली कॉलनीत परिसरातील महेंद्र देशमुख यांच्या घरात मध्यरात्री दोनच्या सुमारास चोरटे घरात शिरले. ते सात जण होते. त्यावेळी घरातील काही लोक जागे झाले. त्यावेळी त्यांनी देशमुख यांच्या पत्नी सौ. दीपा यांच्या डोक्यात काहीतरी घातले आणि त्यांच्याकडून लॉकर मधील सोन्याचे दागिने काढून घेतले. त्या चोरांनी त्या सर्वांना एका खोलीत डांबून बांधून ठेवले. त्यांना दमदाटी करून त्यांच्या कडील काही सोन्याचे दागिने व पैसे घेतले. त्याने त्यांचे समाधान झाले नाही. मग त्यांनी बँकेचे एटीएम कार्ड देशमुखांकडून बळजबरीने घेतले व पाच जण तेथे थांबून दोघांना तेथून सहा – सात किलोमीटरवर असलेल्या डिकसळ येथील एटीएम केंद्रावर पाठवून पैसे काढून घेतले व कार्ड परत आणून दिले.

या दरम्यान पैसे काढताना पिन कोड चुकीचा सांगितला असला तर गडबड होऊ नये म्हणून मोबाईल मधून काढलेले सिम कार्ड एका मोबाईल मध्ये टाकून तो मोबाईल देशमुखांकडे दिला. इतकेच नाही त्यांच्याच कारची चावी घेऊन त्यांची गाडी घेऊन हे दोघे पैसे काढायला गेले होते. तब्बल सव्वा दोन तास या दरोडेखोरांनी देशमुख कुटुंबियांच्या घरात ठाण मांडले होते. तर इतकी त्या चोरांची हिम्मत झाली होती. या विचित्र चोरीचा तपास तत्कालीन पोलीस निरीक्षक सुजाता तानवडे यांनी शिताफीने लावला. त्यात टीप देणारा स्थानिक ग्रामस्थ व दोन सोनार आशा दहा जणांना ताब्यात घेतले होते. त्यानंतर देशमुख यांना सोन्याचे दागिने व रोकड सुद्धा परत मिळाली. एखाद्या सिनेमात घडावी. अशी घटना ही घडली होती.

गेल्याच महिन्यात कर्जत नगरपरिषद हद्दीतील दहिवली विभागातील सुयोग नगर मध्ये राहणारे एक रहिवाशी लंडनला आपल्या मुलाकडे गेले होते. इकडे रात्री चोर त्यांच्या घरात प्रवेश करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे त्यांना सी सी कॅमेऱ्यात दिसले. त्यांनी त्यांच्या नातेवाईक व मित्रांना फोन करून ही घटना निदर्शनास आणून दिली आणि कर्जतच्या घरी असलेल्या लँड लाईनवर फोन केला. फोनची रिंग वाजताच चोरांनी चोरी करण्याचे सोडून तेथून काढता पाय घेतला. सुयोग नगर मध्ये गेल्या दोन वर्षात अनेक चोऱ्या झाल्या मात्र एकाही चोरीचा तपास लागला नाही. असे तेथील रहिवाशांचे म्हणणे आहे. अशा अनेक घटना होत आहेत. एकाच वेळी चार – पाच दुकाने फोडली जातात. परवाच डिकसळ येथील पेढी तून चोरी केलेल्या एका चोराला नेरळ पोलिसांनी पकडले आहे.

काल – परवाच नेरळ नजीकच्या वडवली गवत घर फोडून पंधरा तोळे सोने चोराने लंपास केले मात्र नेरळ पोलिसांनी त्या चोरट्याला गुन्हा नोंदवून झाल्यावर काही तासात मुद्देमालासह पकडले. ही चांगली गोष्ट आहे. मोटार सायकल चोऱ्या होत असतात. विद्युत रोहित्रांच्या मधील तांब्याच्या तारांची चोरी होते. महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र किंवा सोन्याची चैन खेचून नेण्याचे प्रकारही होत आहेत. अलीकडे तांब्याच्या तारे साठी विद्युत रोहित्र चोरीच्या घटनाही घडत आहेत. रेल्वे परिसरात किंवा लोकल, लांब पल्ल्यांच्या गाड्यांमध्ये सुद्धा चोऱ्या होतात. त्यातील अनेक चोऱ्या उघडकीस येऊन तब्बल तीस वर्षांनी सुद्धा मुद्देमाल परत मिळाल्याचा घटना आहेत.



## बदलते तंत्रज्ञान

# यूट्यूबवर तीन मिनिटांपर्यंत व्हिडीओ अपलोडची सुविधा

सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील फेसबुक, इन्स्टाग्राम, यूट्यूब ॲप युजर्सना आकर्षित करतात. फोटो पोस्ट करणे, स्टोरीवर गाणे लावणे, रील पाहणे, लाइव्ह जाणे आदी बरीच फीचर्स युजर्ससाठी या ॲप्सवर उपलब्ध असतात तसेच इन्स्टाग्रामवरचे रील फीचर हळूहळू फेबसबुक व ट्विटरवरसुद्धा सुरू झाले, पण इन्स्टाग्रामव्यतिरिक्त कोणत्याही दुसऱ्या प्लॅटफॉर्मवर एक मिनिटापेक्षा जास्त मोठी रील अपलोड करता येत नव्हती. आता यूट्यूब इन्फ्लुएन्सर हे कन्टेन्ट क्रिएटरसाठी खास काहीतरी घेऊन आले आहे.




यूट्यूब त्यांच्या शॉर्ट्स फीचरवर एक खास अपडेट आणत आहे, जे क्रिएटर्सना तीन मिनिटांपर्यंतचे व्हिडीओ अपलोड करण्याची परवानगी देईल. येत्या १५ ऑक्टोबरपासून हा बदल अमलात येईल. त्यामुळे युजर्सचा यूट्यूब शॉर्ट्सवर कन्टेंट तयार करण्याचा आणि तो वापरण्याचा अनुभव बदलणार आहे, कारण सुरुवातीला युजर्स ६० सेकंदांच्या व्हिडीओवर लक्ष केंद्रित करीत होते, पण नवीन अपडेटमध्ये तीन मिनिटांपर्यंतचा व्हिडीओ अपलोड करण्याचा अनोखा अनुभव युजर्सना घेता येणार आहे.


आधी युजर्स यूट्यूब शॉर्ट्स लहान आणि फास्ट व्हिडीओवर लक्ष केंद्रित करीत होते, जे साधारणपणे एक मिनिटाच्या आत असायचे. या लहान व्हिडीओंमुळे यूट्यूबला टिक टॉक आणि इन्स्टाग्राम रिल्ससारख्या इतर प्लॅटफॉर्म्ससोबत स्पर्धा करण्यात मदत झाली, पण आता यूट्यूब लाँग व्हिडीओला सपोर्ट करणार आहे तसेच या व्हिडीओमुळे पूर्वी अपलोड केलेल्या व्हिडीओवर परिणाम होणार नाही.

याचबरोबर व्हिडीओची लेन्थ वाढविण्याव्यतिरिक्त कन्टेंट क्रिएटर रील्स मनोरंजक, आकर्षक बनविण्यासाठी यूट्यूब टेम्पलेट्स वापरू शकतात. या फीचरद्वारे युजर्सना शॉर्ट्सवरील 'रिमिक्स' बटण टॅप करून 'हे टेम्पलेट वापरा' निवडून, ट्रेंडिंग व्हिडीओ सहजपणे रीमिक्स किंवा पुन्हा तयार करण्यास अनुमती मिळवू शकतात. यामुळे क्रिएटर्सच्या ट्रेंडिंग लोकप्रिय कन्टेंटमध्ये वैयक्तिक स्पर्श जोडण्याचे काम आणखी सोपे होईल.

आगामी महिन्यात आणखी एक अपडेट येणार आहे, ज्यामध्ये यूट्यूबवरील कन्टेंट शॉर्ट्समध्ये मिक्स केले जाईल. कन्टेंट क्रिएटर्सना लवकरच विविध यूट्यूब व्हिडीओंमधून म्युजिक व्हिडीओंसह क्लिप्स वापरण्याची संधी मिळेल, ज्यामुळे ते त्यांचे शॉर्ट्स अधिक आकर्षक बनवू शकतील.

# मराठी काव्याचे प्रवर्तक केशवसुत

आधुनिक मराठी काव्याचे प्रवर्तक म्हणून ओळखले जाणारे एक श्रेष्ठ कवी म्हणजे कृष्णाजी केशव दामले. काव्यरत्नावली या मासिकाचे संपादक नारायण नरसिंह फडणीस यांच्या सूचनेवरून त्यांनी 'केशवसूत' या टोपण–नावाचा स्वीकार केला. केशवसुतांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील मालगुंड या गावी ७ ऑक्टोबर १८६६ रोजी झाला. त्यांची आज जयंती...




## निमित्त

केशवसुतांचे शिक्षण खेड, बडोदे, वर्धा, नागपूर व पुणे या ठिकाणी झाले. त्यांनी विद्यार्थिदशेतच काव्यलेखनास आरंभ केला असला तरी त्यांचा मुख्य काव्यरचनाकाल १८८५ ते १९०५ हाच होय. या काळातील त्यांच्या सुमारे १३५ कविता आज उपलब्ध आहेत. नागपुरास असताना रेव्ह. टिळक व कवी वसंत यांचा सहवास त्यांना लाभला होता. काव्य हे त्यांचे जीवनध्येय असल्याने स्वाभाविकपणेच त्यांनी काव्यरचनेच्या नव्या वाटा चोखाळल्या. या प्रयत्नात प्रारंभीच्या संस्कृत काव्याचा आदर्श अल्पकालीन ठरला व पूर्वकालीन मराठी काव्य प्रभावशून्य ठरले, परंतु इंग्रजीतील स्वच्छंदतावादी मनोवृत्तीच्या वड्स्वर्थ, शेली आणि कीट्स यांसारख्या कवींचे काव्य मात्र त्यांना प्रेरक व अनुकरणीय वाटले. इंग्रजी अभ्यासक्रमातून व वि.मो. महाजनींनी विविधज्ञानविस्तारातून प्रकाशित केलेल्या भाषांतरांवरून इंग्रजी स्वच्छंदतावादी काव्य त्यांस काहीसे परिचित झाले होते. त्या काव्याच्या चिंतन मननातून केशवसुतांनी आत्मलेखनात्मक स्फुट भावकविता लिहिली व मराठी कवितेला इंग्रजी काव्यातील आत्माविष्काराचे नवे व क्रांतिकारक वळण दिले. त्यांच्या काव्यात व्यक्तिगत स्नेहसंबंध, कवी व कवित्व, स्त्रीपुरुषांतील प्रेम, निसर्ग, सामाजिक बंडखोरी व गूढ (सक्षात्कारी) अनुभूती अशा विविध विषयांवरील भावानुभवांचा आविष्कार आढळतो.

केशवसुतांनी अशा जबाबदारीने लिहिलेल्या कवितांपैकी, 'स्फूर्ति' (१८९६), 'कवितेचे प्रयोजन' (१८९९), 'आम्ही कोण?' (१९०१) आणि 'प्रतिभा' (१९०४) या महत्त्वाच्या आहेत. 'भृंग' (१८९०), 'पुष्पाप्रत' (१८९२) व 'फुलपांखरूं' (१९००) या त्यांच्या काही महत्त्वाच्या निसर्गकविता होत. प्रेमविषयक आत्मनिवेदन करणाऱ्या कविताही केशवसुतांनी लिहिल्या. क्रांतिकारक सामाजिक विचार ओजस्वीपणे व्यक्त करणाऱ्या त्यांच्या प्रसिद्ध कविता म्हणजे, 'तुतारी' (१८९३), 'नवा शिपाई' (१८९८) व 'गोफण केली छान' (१९०५) या होत. गूढ अनुभूती व तिची नावीन्यपूर्ण अभिव्यक्ती असलेली 'झपूर्झा' (१८९३) ही त्यांची कविता विशेष गाजली. त्यांच्या अन्य गूढगुंजनात्मक कवितांत 'म्हातारी' (१९०१) व 'हरपले श्रेय' (१९०५) यांचा समावेश होतो.

शिक्षणकालातच १८८०मध्ये त्यांचा विवाह झाला. मॅट्रिकनंतर (१८८९) मुंबईला १८९७पर्यंत निरनिराळ्या हंगामी नोकऱ्या केल्या. पुढे प्लेगमुळे मुंबई सोडून ते खानदेशात गेले. आरंभी भडगावच्या नगरपालिकेच्या शाळेत दुय्यम शिक्षकाची नोकरी केली. १९०१पासून फैजपूरला मुख्याध्यापक म्हणून नेमणूक झाली. १९०४मध्ये धारवाडच्या सरकारी शाळेत मराठीचे शिक्षक म्हणून बदली झाली. १९०५ साली हुबळीला गेले असताना ७ नोव्हेंबर रोजी प्लेगने त्यांचे निधन झाले. त्यांच्यामागून आठच दिवसांनी त्यांची पत्नीही मरण पावली. केशवसुतांचा काव्यसंग्रह त्यांच्या मृत्यूनंतर हरि नारायण आपटे यांनी १९मध्ये प्रकाशित केला. **–रा.श्री. जोग**

## क्लिक...क्लिक...!



**महाड : कोकण रेल्वेतून दिसणारे महाड दासगाव परिसरातील छायाचित्रकार अमेय नाझरे यांनी टिपलेले विलोभनीय दृश्य.**

## आरोग्य प्रहर

# ऑक्टोबर हीटमध्ये अशी घ्या स्वत:ची काळजी

पावसाळा जसजसा संपू लागतो, तसे आपण सगळेच हिवाळा सुरू होण्याची वाट पाहू लागतो, पण सध्या आपण सगळेच 'ऑक्टोबर हीट'चा सामना करीत आहोत, ज्याला पावसाळ्यानंतरचे हवामान म्हणतात. विशेषतः उष्ण कटिबंधीय आणि उपोष्ण कटिबंधीय प्रदेशांमध्ये हे हवामान आढळून येते.



याबद्दल उजाला सायग्नस हॉस्पिटल्सचे वैद्यकीय संचालक डॉ. आविद अमीन सांगतात की, उन्हाळ्यातील उष्णता कोरड्या वातावरणात असते, तर ऑक्टोबर हीटमध्ये पावसाळ्यातून उरलेल्या आर्द्रतेसह उच्च तापमान असते. ऑक्टोबरमध्ये कमी किंवा अगदी न पडलेल्या पावसामुळे वातावरणात आर्द्रता टिकून राहते, ज्यामुळे तापमानातील उष्णता अनुभवायला मिळते, पण ही उष्णता उन्हाळ्यातील तापमानासारखी कोरडी नसते. त्यामुळे विशेषतः उत्तर भारत, महाराष्ट्र, गुजरात यांसारख्या प्रदेशांमध्ये अस्वस्थ करणारे वातावरण निर्माण होते, जे कोरड्या उन्हाळ्याच्या उष्णतेपेक्षा वेगळे ठरते. या कालावधीत वारा नसल्यामुळे अस्वस्थता वाढू शकते, कारण उष्णता, आर्द्रता वातावरणात अडकून राहते. याशिवाय शहरी भागात उष्णतेच्या बेटाच्या घटनेमुळे एक मिश्रित प्रभाव अनुभवला जातो. या ठिकाणी काँक्रीट, डांबरी पृष्ठभाग उष्णता शोषून घेतात आणि ती टिकवून ठेवतात आणि त्यामुळे शहरे या काळात आणखी गरम होतात.

ऑक्टोबर हीटमध्ये सुरक्षित राहण्यासाठी आणि शरीराला हायड्रेशन मिळवून देण्यासाठी दिवसभर भरपूर पाणी प्या. शरीर थंड राहण्यासाठी सौम्य रंगाचे अन् सैलसर कपडे घाला. सकाळी १० ते दुपारी ४दरम्यान खूप ऊन असेल त्या वेळी बाहेर जाणे टाळण्याचा प्रयत्न करा. पंखे, वातानुकूलन यंत्र यांद्वारे तुमच्या घरातील वातावरण थंड ठेवा. शरीराचे तापमान कमी करण्यासाठी वारंवार थंड शॉवर, स्पंज बाथ घ्या फळे, भाज्या भरपूर असलेल्या हलक्या जेवणाचे सेवन करा. त्यामुळे शरीरातील उष्णता न वाढता, तुमची ऊर्जा टिकून राहते आदी उपाय सुचवले आहेत. त्याचबरोबर कॅफिन, अल्कोहोल टाळण्याचा प्रयत्न करा, कारण यामुळे डिहायड्रेशन होऊ शकते. त्याचप्रमाणे या वातावरणात वृद्ध, लहान मुले आदी व्यक्तींची तपासणी करणेदेखील महत्त्वाचे आहे. ते उष्णतेच्या बाबतीत अधिक संवेदनशील असतात. त्यामुळे तुमच्या अन् त्यांच्या शरीराकडे लक्ष द्या. तुम्हाला चक्कर येणे, थकवा येणे किंवा डोकेदुखी जाणवू लागल्यास, उष्णतेशी संबंधित हे आजार टाळण्यासाठी वैद्यकीय मदत घ्या, असे डॉ. अमीन सांगतात.

# आमदार महेश बालदी यांच्या निधीतून चौकमध्ये विकासकामांचा शुभारंभ

**चौक, मोहोपाडा : प्रतिनिधी**

उरण विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नाने स्थानिक विकास निधीतून व राज्य सरकारच्या विविध योजनांद्वारे मंजूर निधितील विकास कामांचा शुभारंभ आमदार महेश बालदि यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून रविवारी (दि.६) चौक ग्रामपंचायत हद्दीत करण्यात आला.






चौक बाजारपेठ अंतर्गत रस्ता व गटारे बांधणे एक कोटी दहा लाख, चौक गावातील तलाव सुशोभिकरण करण्यासाठी तीन कोटी रुपये, चौक येथे सामाजिक सभागृह बांधकाम करण्यासाठी एक कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करून देण्यात आली आहे.

चौक ग्रामपंचायत कार्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्यासाठी तीस लाख रुपये, चौक नवीन वसाहत बौद्धवाडा येथे सामाजिक सभामंडप उभारण्यासाठी ५० लाख तर तेथील अंतर्गत रस्ते काँक्रीटीकरण करण्यासाठी २० लाख रुपये ची तरतुद करण्यात आली आहे. चौक नानिवली येथे सभामंडप साठी ४० लाख रुपये तर अंतर्गत रस्ते यांच्यासाठी २५ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. नम्राची वाडी या आदिवासी वाडीत अंतर्गत रस्ते यांच्यासाठी २० लाख खर्च देण्यात आला आहे, ब्ल्यू व्हेल या नवीन घरकुल सोसायटीत जाणाऱ्या रस्त्यावर ३० लाख रुपये देण्यात आले आहेत.

ग्रुप ग्रामपंचायत चौक कडे जाणाऱ्या रस्त्यावर ग्रुप ग्रामपंचायत चौक व ग्रूप ग्रामपंचायत तुपगाव यांची कार्यालये आहेत. शिवाय याच मार्गावर चौक, तुपगाव, लोधीवली तलाठी कार्यालय व चौक मंडळ अधिकारी यांचेही कार्यालय आहे. चौक ग्रामीण रुग्णालय देखील याच मार्गावर असून पशु वैद्यकीय दवाखाना आणि नागरी वस्ती बरोबर यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालय व नेताजी पालकर विद्या मंदिर चौक हि शाळा आहे, या रस्त्याची अतिशय दयनीय अवस्था झाली होती.

या बाबत चौक सरपंच रितू ठोंबरे यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. आमदार महेश बालदी यांनी त्याला मंजूरी दिल्याने त्यांचे आभार सरपंच रितू ठोंबरे यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमास सरपंच रितू ठोंबरे, रायगड जिल्हा भारतीय जनता पक्षाचे उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, तालुका अध्यक्ष प्रवीण मोरे, भारतीय आर पी आय तालुका अध्यक्ष महेन्द्र धनगावकर, चौक चे उद्योगपती आणि भारतीय जनता पक्षाचे नेते विनोद भोईर आणि अवधूत करमरकर, तुलसीदास डोंगरे, माजी अध्यक्ष रामदास ठोंबरे, चौक शहर अध्यक्ष गणेश कदम, अशोक पटेल, सागर ओसवाल, मनोहर पटेल, दर्शन पोळेकर, चौक उपसरपंच सुभाष पवार, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### गावागावातील देवींचे दर्शन

*दरम्यान, चौक परिसरात नवरात्री उत्सव साजरा होत आहे. त्याअनुषंगाने आमदार महेश बालदी यांनी येथील सार्वजानिक नवरात्रोत्सव मंडळातील देवींचे दर्शन व काही गावांत ग्राम दैवतांचे दर्शन घेतले. आज चौक, तुपगाव, वरोसे, वावंढळ, कलोते, बोरगाव, लोधीवली, नढाळ, पाली, नानीवली, नम्राची वाडी, भिलवले येथे जाऊन दर्शन घेतले. त्यांच्या सोबत सुधीर ठोंबरे, प्रवीण मोरे, विनोद भोईर, अवधूत करमरकर, गणेश कदम, रामदास ठोंबरे, अशोक पटेल, सागर ओसवाल व कार्यकर्ते उपस्थित होते. मंडळ व ग्रामस्थांनी शाळ, श्रीफळ देऊन सत्कार केला.*

# 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन कर्जतकरांना स्फूर्ती देईल'

**कर्जत : प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन कर्जतकरांना स्फूर्ती देणारे असेल, असा विश्वास कर्जत विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेंद्र थोरवे यांनी व्यक्त केला.



कर्जत शहरातील अग्निशमन केंद्रा नजीक बांधण्यात येणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनाचे भूमिपूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, कर्जत शहरात आंबेडकर भवन साठी संघर्ष करणाऱ्या संघर्ष समितीचे काम पंधरा वर्ष पाहत होतो आणि म्हणून आपण आमदार झालो त्या दिवसापासून शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन उभारण्याचे स्वप्न पाहिले होते. ७ जानेवारीला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे विकास कामांच्या लोकार्पण सोहळ्यासाठी आले होते. त्यावेळी त्यांनी सर्वांसमक्ष कर्जतमध्ये डॉ. आंबेडकर भवन साकारले जाईल. असा शब्द दिला होता. माझ्या हस्ते आज डॉ बाबासाहेब आंबेडकर भवनाचे भूमिपूजन होत आहे हे माझे भाग्य आहे. त्या निमित्ताने मुख्यमंत्र्यांचा शब्द ही पाळला जात आहे. याचा मला आनंद होत आहे.

भूमिपूजन सोहळ्यानिमित्ताने आमदार थोरवे यांची शहरातून वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. या वेळी आंबेडकरी जनतेची उपस्थिती इतकी होती की, अक्षरशः भिमसागर लोटला होता. प्रारंभी भंते महेंद्र बोधी यांच्या संघाच्या वतीने प्रार्थना झाली. त्यानंतर आमदार महेंद्र थोरवे यांचे हस्ते करण्यात आले.

या वेळी शिवसेना उत्तर रायगड जिल्हाप्रमुख संतोष भोईर, आरपीआय आठवले गटाचे जिल्हा अध्यक्ष नरेंद्र गायकवाड, कोकण प्रदेश संघटक राहुल डाळिंबकर, स्वाभिमान रिपब्लिकन पक्षाचे जिल्हा अध्यक्ष उत्तम जाधव, सिद्धार्थ सदावर्ते, आझाद पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड. सुमित साबळे, सचिन भालेराव, ॲड. उत्तम गायकवाड, मारुती गायकवाड, जिल्हा परिषदेचे माजी सभापती सुभाष गवळे, माजी उपनगाध्यक्ष अशोक ओसवाल, माजी नगरसेवक संकेत भासे, प्रसाद थोरवे, सुनील गायकवाड, अरविंद मोरे, शिवसेना तालुका प्रमुख संभाजी जगताप, विधानसभा संघटक शिवराम बदे, दिलीप ताम्हाणे, भाजप तालुका अध्यक्ष राजेश भगत, भाजप जिल्हा चिटणीस रमेश मुंढे, आरपीआय आठवले गट तालुका अध्यक्ष हिरामण गायकवाड, दीपक मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

यानंतर रॉयल गार्डनच्या सभागृहात जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन संघर्ष समितीचे पदाधिकार्यांनी आमदार थोरवे व उपस्थितांचे स्वागत केले होते. दीपक भालेराव यांनी संघर्ष समितीने केलेल्या कार्याचा आढावा घेताना भवनामध्ये वाचनालय, ध्यान धारणा सभागृह, सामाजिक सभागृह, गौतम बुद्धांचा पुतळा, शिवरायांचा पुतळा, महात्मा फुलेंचा पुतळा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा उभा पुतळा तसेच उद्यान, कॉन्फरन्स हॉल, अभ्यासिका आदी सुविधा असणार आहेत, असे सांगितले.

ॲड. सुमित साबळे, सचिन भालेराव यांनी मनोगते व्यक्त केली. समीर सोमणे यांनी सूत्रसंचालन केले. सिध्दार्थ सदावर्ते यांनी आभार मानले. आंबेडकर अनुयायांनी उपस्थित होते.

# ट्रेन व फलाटमध्ये अडकून एक जखमी

**पाली : प्रतिनिधी**

रोहा रेल्वे स्थानकात रविवारी (दि. ६) सकाळी दिवा सावंतवाडी पॅसेंजर मधून पडून तरुण ट्रेन व फलाटमध्ये अडकून जखमी झाला आहे. रोहा तालुका शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

याबाबत सविस्तर माहिती अशी की रोहा रेल्वे स्थानकामध्ये दिव्यावरून सावंतवाडी कडे जाणाऱ्या दिवा सावंतवाडी पॅसेंजर मधून प्रेम प्रदीप कांबळे (वय २५) रा. म्हसळा याचा पाय घसरून तो रेल्वे व फलाटाच्या मध्ये अडकला. या घटनेची माहिती मिळताच ड्तठ्ड्ड टीम व धाटाव अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचले. त्यांनी अडकलेल्या तरुणाला सुखरूप बाहेर काढले व पुढील उपचाराकरिता रोहा तालुका शासकीय रुग्णालयात भरती करण्यात आले आहे.



# हिरवळ महाविद्यालयात मोफत दंत तपासणी

**माणगाव :** हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट, कॉलेज ऑफ सायन्स (कॉम्प्युटर सायन्स आणि इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी) महाड आणि योगिता दंत महाविद्यालय, खेड यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात सोमवारी (दि. ७) सकाळी १० ते दुपारी २:३० या वेळेत मोफत दंत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

हिरवळ महाविद्यालय समाजपयोगी उपक्रमांचे आयोजन कायम करत असते. याच माध्यमातून आरोग्य जागरूकता वाढवणे आणि विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचारी, समाज यांना मोफत दंत तपासणी प्रदान करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

# तरुणीसोबत असभ्य वर्तन

**पेण :** तरुणीशी असभ्य वर्तन केल्याप्रकरणी तरुणाविरोधात पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तरुणीला आरोपी याने ३० सप्टेंबर रोजी पेणमधील कासार तलाव येथे बोलावून आपण फिरायला जावु असे सांगून फिर्यादी यांच्या मनास लज्जा होईल असे कृत्य केले तसेच फिर्यादी यांची बदनामी केली. याप्रकरणी आरोपीविरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास महिला पोलीस हवालदार श्रीमती जाधव ह्या करीत आहेत.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी मौजे पळस्पे, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत विदयमान मालक श्री. राजेंद्र नरहर पाटील यांच्याकडून विकत घेण्याबद्दल प्राथमिक बोलणी चालू आहेत व सदरील मिळकत निर्वेध व बोजारहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विदयमान मालकांनी दिलेला आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे पळस्पे, ता. पनवेल, जि. रायगड**

| गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र आर.चौ.मी | आकार |
|---|---|---|---|
| १४५ | ४ | ३-७२-०० | ३७.२० |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त, खरेदीखत, साठेकरार, कोर्टात दावा, मुत्युपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्गासह आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन ७ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व वरील मुदती नंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**पनवेल,**
**तारीख: ०६/१०/२०२४**

**सही/-**
**प्रसाद वामन कोंडे देशमुख**
**ॲडव्होकेट, पनवेल**


# माणगाव उपजिल्हा रुग्णालयाची श्रीसदस्यांनी केली स्वच्छता



**माणगाव : प्रतिनिधी**

स्वच्छता हि सेवा हा उद्देश नजरेसमोर ठेऊन महाराष्ट्र भूषण डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान अंतर्गत डॉ. श्री आप्पासाहेब धर्माधिकारी व डॉ. श्री सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली माणगाव तालुक्यातील श्रीसदस्यांनी रविवारी (दि.६) सकाळी माणगाव उपजिल्हा रुग्णालयाची स्वच्छता चांगल्या प्रकारे करून रुग्णालय व परिसर चकाचक केला.

श्रीसदस्यांच्या या उपक्रमांचे तालुक्यात विशेष कौतुक होत आहे. स्वच्छ भारत अभियान नागरी अंतर्गत केंद्रीय गृहनिर्माण तथा शहरी कार्य मंत्रालय भारत सरकार यांच्या मार्फत १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत स्वच्छता पंधरवडा राबविण्याचे निर्देश देण्यात आले होते. याचाच एक भाग म्हणून स्वच्छता हि सेवा अंतर्गत उपक्रमाच्या अनुषंगाने माणगाव तालुक्यातील ५३५ श्री सदस्यांनी एकत्रित येत माणगाव शहरातील उपजिल्हा रुग्णालयाची स्वच्छता केली.

या वेळी श्रीसदस्यांनी रुग्णालय परिसरातून १५ टन इतका सुका कचरा गोळा करून हा कचरा पाच ट्रॅक्टर लावून उचलण्यात आला.

श्रीसदस्यांनी हाती घेतलेल्या या उपक्रमावेळी माणगाव उपजिल्हा रुग्णालयाच्या प्रभारी वैध्यकीय अधीक्षक डॉ. अरुणा पोहरे, परिचारिका शिवकांता गवळी आदी उपस्थित होते.

# माथेरानमध्ये जंतुनाशक फवारणी

**माथेरान : प्रतिनिधी**

गावातील काही भागातील नागरिकांची स्वच्छतेच्या बाबतीत मानसिकता नसल्याने काही ठिकाणी डासांचा प्रादुर्भाव निर्माण झाला असून काही दिवसांपूर्वी डेंग्यूचे रुग्ण शहरात आढळून आले आहेत. त्यामुळे आरोग्य विषयक सावधगिरी बाळगून येथील गावातील सर्वच भागात नगर परिषदेच्या माध्यमातून प्रशासक तथा कार्यक्षम मुख्याधिकारी राहुल इंगळे यांच्या सूचनेनुसार जंतुनाशक फवारणी करण्यात येत आहे.

गावातील उघडी गटारे आणि त्यातूनच वाहून जाणारे सांडपाणी आणि स्वच्छतेच्या बाबतीत मानसिकता नसलेल्या नागरिकांनी उघड्या गटारात टाकलेल्या ओल्या कचऱ्यामुळे याठिकाणी डासांचा प्रादुर्भाव वाढत आहे.यामुळे येथे नागरिकांना आजार उद्भवण्याची शक्यता नाकारता येत नाही. डेंग्यूसारखे आजार बळावले तर एखाद्या व्यक्तीला आपला जीव गमवावा लागण्याची शक्यता आहे. यासाठी स्वच्छता राखणे हे नागरिकांचेसुध्दा कर्तव्य आहे.

घनकचरा व्यवस्थापनाच्या कचरा वेचक महिला नियमितपणे कचरा गोळा करण्यासाठी घरोघरी जाऊन कचऱ्याचे संकलन करीत असतात परंतु जे नागरिक अनेकदा घरातील कचरा उघड्या गटारात टाकत आहेत त्यांच्यावर दंडात्मक कारवाई होण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे लावल्यास वचक बसून स्वच्छता राखण्यास मदत होऊ शकते.

मागील काही दिवसांपूर्वी माथेरान आरोग्य विभागाकडून डेंग्यू आणि मलेरिया अश्या आजारापासून नागरिकांनी कश्या प्रकारे काळजी घ्यावी याबाबत माहिती समाजमाध्यमांवर प्रसारित करण्यात आली आहे.




## महाराष्ट्र शासन

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**

**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

### निविदा सूचना क्रमांक ६० सन २०२४-२०२५

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालील प्रमाणे **बी १** नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसारा / बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | निजामपुर कोंशिबळे रस्त्यावरील प्रा मा ९७ किमी २/१०० मधील मोठ्या पुलांची बांधकाम करणे ता माणगाव जि रायगड | ५७४८८९१८/- | २८८०००/- | २५४०/- | १२ महिने | आवश्यकता नाही |
| २ | हरवंडी ते वाकी रस्ता प्रा मा २४२ कि मी २/३०० वरील मोठया पुलांची पुर्नबांधणी करणे ता माणगाव जि रायगड | २६०८५०७३/- | १५००००/- | २३६०/- | १२ महिने | आवश्यकता नाही |
| ३ | तळाघर येथील महादेव मंदिर व परिसराचे सुशोभिकरणे करणे ता रोहा जि रायगड | १८७५५२६०/- | १५००००/- | ११८०/- | १२ महिने | आवश्यकता नाही |
| ४ | रोहा वनविभाग ता रोहा जि रायगड च्या रोहा रेंज येथील जामगाव ३०००.०० Rmt C N0 ३७९ मध्ये GI तारेचे कुंपण पुरवणे आणि उभारणे | १५९०९८३८/- | १५००००/- | ११८०/- | १२ महिने | आवश्यकता नाही |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **०४.१०.२०२४** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **११.१०.२०२४** वेळ १८.०० वाजेपर्यत |
| २ | **निविदापुर्व बैठक** | मा. मुख्य अभियंता, सा. बां. प्रादेशिक विभाग कोंकण, मर्झबान रोड, फोर्ट मुंबई यांचे कार्यालयात दिनांक **७.१०.२०२४ वेळ १२.००वाजता. अ.क्र १ ते २ करीता** मा. अधीक्षक अभियंता, रायगड (सा.बां) मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक **०७.१०.२०२४ वेळ ०३.०० वाजता. अ.क्र ३ ते ४ करीता** |
| ३ | ऑनलाईन व्दारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | अधीक्षक अभियंता, रायगड सा. बां. मंडळ, कोकणभवन, नवीमुंबई यांचे कार्यालयात दिनांक **१२.१०.२०२४** वेळ १२.०० वाजता |

**टिप :-** परिपूर्ण निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धिपत्रके तसेच इतर काही दुरूस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेत स्थळांवरच पाहता येतील.

**सही/**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/ ४७३०**
**दिनांक : १/१०/२०२४**


# कर्जतमध्ये रंगला खेळ पैठणीचा

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुका भाजपचे महिला मोर्चाचे वतीने खेळ पैठणीचा कार्यक्रमाचे बहिणींचा देवाभाऊ.. खेळ या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या वेळी कर्जत तालुक्यातील १३०० महिलांनी सहभाग घेतला.



कर्जत येथील रॉयल गार्डन येथे भाजपच्या महिला मोर्चाचे वतीने महिलांसाठी विविध खेळ आयोजित केले होते. बहिणींचा देवाभाऊ... खेळ पैठणीचा या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, भाजप जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, कर्जत माजी उप नगराध्यक्ष अशोक ओसवाल, भाजप तालुका अध्यक्ष राजेश भगत, कर्जत विधानसभा मतदारसंघ निवडणूक प्रमुख किरण ठाकरे, फ्रेंड्स ऑफ भाजप जिल्हा संयोजक नितीन कांदळगावकर आदी उपस्थित होते. प्रास्ताविक महिला मोर्चा तालुका अध्यक्ष नम्रता कांदळगावकर यांनी केले.

महिलांसाठी आयोजित केलेला खेळ पैठणीचामध्ये उत्कर्ष इव्हेंट यांनी संचालित केला. यावेळी उत्कर्ष इव्हेंट चे प्रमुख प्रदीप गोगटे यांनी विविध खेळ आयोजित केले तसेच महिलांसाठी स्पर्धा घेतल्या. त्यामध्ये नागेवाडी मधील महिलांनी आदिवासी नृत्य सादर करून सर्वांची वाहवा केली.या खेळ पैठणीचे मध्ये कर्जत तालुक्यातील १३०० महिलांनी सहभाग घेतला. त्यात दोन विजेत्यांना पैठणी तर सहभागी महिलामधून लकी ड्रॉचे माध्यमातून एक पैठणी देण्यात आली.

भाजप महिला मोर्चा यांच्याकडून नियोजन करण्यात आले होते. कर्जत तालुका अध्यक्षा नम्रता कांदळगावकर, महिला मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष नेरळ शहर अध्यक्षा श्रद्धा कराळे, साधना गरुड, मृणालिनी शेळके, वर्षा सुर्वे, राधा बहुतुले, अर्चना फोपे, शोभा शेंडे आदी उपस्थित होत्या.

## निवडक

### दोन दुचाकींची चोरी

**पनवेल :** रेल्वे स्टेशन परिसरात फुटपाथवर दोन दुचाकी वाहनांची चोरी अज्ञात चोरट्यांनी केल्याची घटना घडली आहे. रेल्वे स्टेशन येथील पे ॲण्ड पार्क गाड्यांनी भरलेली असल्याने अनेक जण आपली दुचाकी वाहने तेथे परिसरात असलेल्या फुटपाथवर उभी करून कामानिमित्त निघून जातात. याचाच फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी ठिकाणची दोन दुचाकी चोरुन नेल्या आहेत. वाहन मालकांनी आपले वाहन सीसीटीव्ही कॅमेऱ्यासमोर त्याचप्रमाणे हॅण्डल लॉक व टायर लॉक करावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

### बँकेसमोरून दुचाकी पळवली

**पनवेल :** ८१ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाने नवीन पनवेल येथील बँकेच्या समोर दुचाकी पार्क केली. आणि चोरांनी ती पळून नेली. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात अनोळखी व्यक्तीविरोधात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला. अरविंद करपे हे सेक्टर आठ खांदा कॉलनी येथे राहत असून त्यांनी नवीन पनवेल येथील जनकल्याण सहकारी बँकेच्या समोरील रस्त्यावर स्कूटी गाडी हँडल लॉक करून ठेवली होती व ते बँकेत गेले. बँकेचे पासबुक भरून ते परत आले असता त्यांना गाडी दिसली नाही. त्यांनी ट्राफिक विभागात गाडीची चौकशी केली, मात्र ती सापडून आली नसून चोरी झाली.

### आमदार संजय शिरसाट यांचा सत्कार

**पनवेल :** सिडको महामंडळाचे अध्यक्ष आमदार संजय शिरसाट यांनी सर्व सिडकोचे घरे फ्री होल्ड करण्याचा प्रस्ताव मंजूर केल्याने फ्लॅटधारकांना ट्रान्सफर फी भरण्याची गरज नाही, तसेच कन्वेंस डीड करताना लागणारा सिडको ट्रान्सफर फी पूर्णपणे माफ करण्यात आली आहे. आमदार शिरसाट यांनी केलेल्या प्रयत्न व तत्पर कार्यवाही केल्याबाबत शिवसेना पनवेल महानगर संघटक मंगेश रानवडे आणि खारघर शहर संघटक इम्तियाज शेख यांनी भेट घेऊन त्यांचे आभार मानले. सिडको महामंडळाने पारित केलेल्या प्रस्तावावर, पुढील तीन ते चार दिवसात कॅबिनेट मीटिंगमध्ये, मंजुरी निश्चित प्राप्त होण्याची ग्वाही आमदार शिरसाट यांनी दिली.

### जप्त वाहनांच्या मालकांना आवाहन

**पनवेल :** कामोठे पोलीस ठाण्याच्या हद्दीत विविध गुन्ह्यात जप्त केलेल्या वाहनांची ओळख पटवून ती मुळ मालकाने परत नेण्याचे आवाहन वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय कांबळे यांनी केले आहे. कामोठे पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात सन २०१३ ते सन २०२४ या कालावधीत एकूण ३१ वाहने त्यात दुचाकी व चारचाकी वाहनांचा समावेश आहे. जप्त करण्यात आलेली आहेत. नमूद वाहनांच्या मालकांचा शोध तपास करण्यात आला असता कोणतेही वाहन मालक अद्याप मिळून आलेले नाहीत. तर सदर वाहन मालकांनी वाहनांची ओळख पटविण्याकामी कामोठे पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन कामोठे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय कांबळे यांनी केली आहे.

# रसायनीमध्ये २१ कोटींच्या विकासकामांचा झंझावात

## आमदार महेश बालदी यांच्या हस्ते भूमिपूजन, लोकार्पण

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

उरण विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश बालदी यांच्या स्थानिक विकास निधी अंतर्गत रसायनी विभागात तब्बल २१ कोटींच्या विकासकामे होणार आहेत. यातील एक कोटी ४० लाखांचे काम वगळता सर्व कामांचा शुभारंभ शनिवारी (दि.५) सायंकाळी आमदार महेश बालदी यांच्या हस्ते करण्यात आला.



लोधिवली विभाग, दुर्गामाता कॉलनी, गणेशनगर, कांबे, चांभार्ली, शिवनगर, मोहोपाडा आदी वासांबे ग्रामपंचायत हद्दीत विविध विकासकामांचे भूमीपुजन व वासांबे-मोहोपाडा ग्रामपंचायतीच्या ग्रामनिधी फंड अंतर्गत रुग्णवाहिका लोकार्पण सोहळा झाला.

रस्ते काँक्रीटीकरण, गाव सभा मंडप, स्मशानभूमी, संरक्षण भिंत, उद्यान विकसित करणे, गटारांचे काँक्रीटीकरण, तलाव सुशोभिकरण, सामाजिक सभागृह बांधणे अशा विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण आमदार महेश बालदी यांच्या हस्ते झाले. दरम्यान, यापैकी एक कोटी ४० लाख निधींच्या कामाचा शुभारंभ आचारसंहितेपूर्वी होणार आहे.

उरण विधानसभा मतदार संघाचा विकास हेच माझे ध्येय असून यापुढेही या मतदारसंघाचा विकास करण्यासाठी मी हजारो कोटी रुपयांचा विकास निधी केंद्र व व महाराष्ट्र शासनाकडून मंजूर करून आणून उरण विधानसभा मतदारसंघाचा कायापालट करेन, असे आमदार महेश बालदी यांनी मोहोपाडा ग्रामपंचायत सभागृहात सांगितले.

या वेळी तालुका अध्यक्ष प्रवीण मोरे, वासांबे विभाग अध्यक्ष सचिन तांडेल, सरपंच उमा मुंढे, उपसरपंच भुषण पारंगे, सदस्य उपस्थित होते.

# भाजप सोशल मीडिया, आयटी सेलची बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप उत्तर व दक्षिण रायगड जिल्हा सोशल मीडिया आणि आयटी सेलची बैठक श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहामध्ये उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी तसेच सुशीलकुमार शर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली.

या वेळी उत्तर रायगड जिल्हा सोशल मीडिया संयोजिका ॲड गायत्री परांजपे, आयटी संयोजक नितेश सोळंकी, कौस्तुभ भिडे यांच्यासह महिला मोर्चा सोशल मीडिया प्रदेश सहसंयोजिका बिना गोगरी, सह संयोजिका मोना अडवाणी, ओबीसी मोर्चा सोशल मीडिया जिल्हा प्रभारी प्रसाद हनुमंते, सह प्रभारी स्नेहल बोधई, खारघर मंडल संयोजक अजय माळी, कळंबोली शहर संयोजक ज्ञानेश्वर चौधरी, पनवेल तालुका संयोजक डी.के.भोईर, अंकुश पाटील, चेतन कांबळे आदी उपस्थित होते.

दरम्यान, स्नेहल बोधई यांची ओबीसी मोर्चा सोशल मीडिया जिल्हा सहप्रभारी म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल अभिनंदन करण्यात आले.





# श्री इंद्रायणी एकविरा मंदिर परिसर उजळणार

**उरण : रामप्रहर वृत्त**

घटस्थापनेच्या मुहूर्तावर श्री इंद्रायणी एकविरा मंदिर परिसर विद्युती करण कामाचा भूमिपुजन सोहळा आमदार महेश बालदी यांच्या हस्ते झाला.

श्री इंद्रायणी एकवीरा मंदिर परिसर विद्युती करणासाठी आपल्या आमदार निधीतून वार्षिक जिल्हा नियोजन सन २०२४-२०२५ अंतर्गत ४० लाखाचा निधी मंजूर केला आहे. तसेच कळंबुसरे गावातील अंतर्गत रस्त्याच्या कामासाठी १२ लाखाचा निधी मंजूर केला असून त्या दोन्ही कामाचा भुमिपुजन सोहळा गुरुवारी (दि३) घटस्थापनेच्या मुहूर्तावर आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीत झाला.



उरण कळंबुसरे परिसरातील समाजसेवक कै. सुरेशशेठ राऊत यांनी इंद्रायणी डोंगर माथ्यावर श्री एकवीरा देवीच्या मंदिराची उभारणी केली आहे. या मंदिराची दखल शिवसेनाप्रमुख हिन्दु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी घेतली होती. सध्या हे मंदिर लाखो भाविकांचे श्रध्दास्थान बनले आहे, मात्र विद्युत रोषणाईच्या तुटपुंज्या सेवेमुळे भाविकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे निसर्गाच्या सान्निध्यात वसलेल्या या मंदिराला पर्यटनाचा दर्जा मिळावा तसेच नागरी सुविधा उपलब्ध करून मिळाव्यात यासाठी इंद्रायणी एकवीरा माता ट्रस्ट कळंबुसरेचे सुशील राऊत, सुरेंद्र राऊत आणि मित्र परिवार यांनी आमदार महेश बालदी यांच्याकडे मागणी केली होती.

या वेळी उद्योजक पी.पी. खारपाटील, भाजपचे तालुकाध्यक्ष रवी भोईर, महावितरण चे अभियंता जयदीप नानोटी, महावितरणचे अभियंता सतीश सर्वोदय, महिला तालुकाध्यक्ष ॲड. राणी म्हात्रे, कळंबुसरे सरपंच उर्मिला प्रशांत नाईक, उपाध्यक्षा संगीता रविंद्र गायकवाड, पुर्व विभाग अध्यक्ष शशी पाटील, जेष्ठ नेते सुरदास राऊत, रत्नाकर राऊत, इंद्रायणी एकवीरा माता ट्रस्ट कळंबुसरे चे तथा माजी सरपंच सुशील राऊत, उद्योजक सुरेंद्र राऊत, उप अभियंता वर्षा मगर,माजी जिल्हा परिषद सदस्य विजय भोईर, दिघाटीच्या सरपंच रजनी ठाकूर, माजी सरपंच नुतन कुलदिप नाईक, साई उपसरपंच हिरामण मोकल, उद्योजक कुलदिप नाईक, कळंबुसरे शाखा अध्यक्ष राजेश पाटील, उद्योजक सागर खारपाटील, उद्योजक देवेंद्र पाटील, सुशांत पाटील, गजानन केणी, रमेश फोफेरकर, जयेश खारपाटील आणि कळंबुसरे, चिरनेर, दिघाटी केळवणे व साई, सह पदाधिकारी, कार्यकर्ते, भक्तगण उपस्थितीत होते.

माजी सरपंच सुशिल राऊत, सुरदास राऊत यांनी आमदार महेश बालदी, महावितरण कंपनीचे अभियंता यांचे आभार मानले.



**उलवे नोड : मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेतील लाभार्थी महिलांना आमदार महेश बालदी यांच्याकडून साड्या वाटप करण्यात येत आहेत. हा कार्यक्रम उलवे नोड सेक्टर ८ येथे झाला. या वेळी वहाळचे माजी उपसरपंच अमर म्हात्रे, गव्हाणचे माजी उपसरपंच विजय घरत, भाजप उलवे नोड उपाध्यक्ष अवधेश कुमार महतो, मयुर म्हात्रे, मंजूल शुक्ला आदी उपस्थित होते.**

# एनएमबीएतर्फे भव्य शारदोत्सव

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई बंगाली असोसिएशन (एनएमबीए) ही महाराष्ट्रातील बंगालींसाठी एक प्रमुख सामाजिक-सांस्कृतिक केंद्र आहे. असोसिएशनच्या वतीने पाच दिवसीय शारदोत्सव सोहळा आयोजित करण्यात येणार आहे.

पूर्णपणे वातानुकूलित असलेल्या सिडको एक्झिबिशन सेंटर, हॉल नंबर १, सेक्टर ३०, वाशी, (वाशी रेल्वे स्टेशनच्या पुढे) येथे हा सोहळा होणार असून,१,५०,००० चौरस फूट क्षेत्रफळातील या सेंटरमधील कार्यक्रमाला आठ लाख हून अधिक लोक उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे.

पश्चिम बंगालमधील कारागिरांनी पवित्र गंगेच्या काठावरील जैव-विघटनशील माती वापरून बनवलेली १८ फूट मूर्ती पाहण्याजोगी असेल. पारंपारिक पूजा विधींपासून ते देशभरातील कलावंतांच्या उत्कृष्ट निर्मितीचे सादरीकरण करत अर्पणांच्या प्रभावी सोहळ्याचा अनुभव यावेळी घेता येईल. या कार्यक्रमात कोलकाता आणि बॉलीवूडमधील प्रसिद्ध कलाकार, अन्वेषा, अनुपम रॉय, आकृती ककर आणि अभिजित भट्टाचार्य यांचा दमदार परफॉर्मन्स जाईल.

एनएमबीए सर्व भाविकांसाठी तीन दिवसीय मोफत भोग वितरणाचे आयोजन करेल ज्यामध्ये वंचित मुलांचा रॅम्प वॉक आणि ज्येष्ठ नागरिकांचे सांस्कृतिक कार्यक्रम यांचा समावेश असलेला फॅशन शो यांचाही समावेश आहे.

# नवीन पनवेलमध्ये आरोग्य शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल सेक्टर ६ येथील मोरया मल्टीस्पेशालिटी डेंटल क्लिनिक (एमएमडीसी) येथे डॉ. तन्वी बांदेकर (एमएमडीसी) यांनी आपली सामाजिक जबाबदारी ओळखून एमएमडीसीच्या दुसऱ्या वर्धापन दिनानिमित्त भव्य आरोग्य शिबिर आयोजित केले होते.



यामध्ये मोफत दंत तपासणी, नेत्र तपासणी आणि रक्त तपासणी, ब्लड शुगर, बीपी, तपासणी शिबिर करण्यात आले तसेच अल्पदरात चष्मा वाटप करण्यात आले.

मोरया मल्टीस्पेशालिटी डेंटल क्लिनिक आणि आयरिस हॉस्पिटल नवीन पनवेल यांच्या संयुक्त प्रयत्नांतून शिबिरात अनेक गरजू लोकांनी उपस्थित राहून शिबिरात सवलतींचा लाभ घेतला. सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत डॉक्टरांच्या टीमने २०० अधिक रुग्णांची तपासणी केली.

डॉ. तन्वी आशिष बांदेकर आणि डॉ. मानसी मोरे यांच्या नेतृत्वात सर्व डॉक्टर्स, अपोलो हॉस्पिटल स्टाफ, लाईफ सेल Pathology Laboratory, श्री दत्त फार्मा यांनी चांगले योगदान दिले.

# फुंडे हायस्कूलमध्ये रयत शिक्षण संस्थेचा वर्धापन दिन उत्साहात

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे येथे शुक्रवारी (दि.४) रयत शिक्षण संस्थेचा १०५वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला.

पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ४ ऑक्टोबर १९१९मध्ये काले या ठिकाणी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली आणि खऱ्या अर्थाने महाराष्ट्रातील बहुजन समाजातील गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाची ज्ञानगंगा दारी आणली. आज संस्थेला १०५ वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्ताने संस्थेच्या प्रत्येक शाखेत रयत शिक्षण संस्थेचा वर्धापन दिन उत्साहाने साजरा केला जात आहे. फुंडे हायस्कूलमध्ये विद्यालयाच्या स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन कृष्णाजी कडू, प्राचार्य एम. जी. म्हात्रे, सांस्कृतिक विभाग प्रमुख एच. एन. पाटील, न्हावा शेवा पोलीस स्टेशनच्या पोलीस दीदी किरण जगताप, माजी शिक्षक बी.ए. मोहिते, माजी ग्रंथपाल डी. ए. घरत तसेच सर्व शिक्षकांच्या हस्ते पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील आणि रयत माऊली लक्ष्मीवहिनी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

इयत्ता सातवीच्या वर्गाने या कार्यक्रमाची तयारी त्यांच्या वर्गशिक्षिका सीमा माळी यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तम प्रकारे केली होती. अमित पाटील या विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणात संस्थेची महती आणि कर्मवीर अण्णांचे कार्य सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमृता जाधव या विद्यार्थिनीने केले.

**पनवेल : शारदेय नवरात्र उत्सवाचा चौथा दिवस. पळस्पे गावातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या येथून प्रेरणा मंत्र घेऊन दौड सुरू करण्यात आली, पुढे मार्गक्रमण करीत गावातील तिसाई देवीच्या मंदिरात येवून तेथे देवीची आरती करण्यात आली, गोंधळ आणि श्लोक घेण्यात आले नंतर संपूर्ण पळस्पे गावात दौड काढण्यात आली. नंतर दौड कुडावे गावात येवून पोहचली. तेथे भावदेवी आणि गावदेवी मंदिरात आरती करण्यात आली, श्लोक घेण्यात आले व पुन्हा मार्गक्रमण करीत दौड कुडावे गावातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाजवळ येवून तेथे ध्येयमंत्र घेऊन दौडची सांगता करण्यात आली तसेच दुसरी दौड ही करंजाडेमध्ये काढण्यात आली. करंजाडेमधील सेक्टर २,३,४,५,६ मध्ये दौड काढण्यात आली व शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या इथे येऊन धेयमंत्र घेऊन दौडची सांगता करण्यात आली.**




# प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांना पुरस्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या पनवेलमधील महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गणेश ठाकूर यांना रयत शिक्षण संस्थेचा सन्मानाचा प्रबोधनकार ठाकरे आदर्श प्राचार्य पुरस्काराने गौरविण्यात आले.



रयत शिक्षण संस्थेचा १०५वा वर्धापन दिन शुक्रवारी (दि.४) संस्थेच्या स्थानिक शाखांच्या वतीने कर्मवीर समाधी परिसर,सातारा येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या समारंभात विशेष कामगिरीसाठी पद्मभूषण कर्मवीर डॉ.भाऊराव पाटील यांच्या हयातीत व नंतर विशेष योगदान दिलेल्या थोर व्यक्तींच्या स्मृतीप्रित्यर्थ दरवर्षी पुरस्कार दिला जातो.

पुरस्कारामध्ये मा. प्रबोधनकार ठाकरे यांचे नावे दिला जाणारा आदर्श प्राचार्य या पुरस्कारासाठी अतुलनीय नेतृत्व, समर्पण आणि शिक्षणातील महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल डॉ. गणेश ठाकूर साहेब हे पुरस्काराचे पात्र प्राप्तकर्ता म्हणून निवडले गेले.

या वेळी प्रमुख पाहुणे डॉ. वसंत काळपांडे, (माजी शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य), कार्यक्रमाचे अध्यक्ष व 'रयत'चे चेअरमन चंद्रकांत दळवी, व्हाईस चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे, सचिव विकास देशमुख, संघटक डॉ. अनिल पाटील, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख यांची विशेष उपस्थिती होती. रयत शिक्षण संस्थेच्या विविध विभागातील प्रमुख अधिकारी व शाखेतील प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते डॉ.गणेश ठाकूर यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांच्या कारकिर्दीत संस्था व पनवेल महाविद्यालयाने यशाचे उत्तुंग शिखर गाठत, शिक्षण आणि विद्यार्थी विकासामध्ये उच्च दर्जा स्थापित केला आहे.

# महात्मा फुले महाविद्यालयाच्या पार्थ मानेचा 'सुवर्ण' वेध





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या पनवेल येथील महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचा इयत्ता बारावी विज्ञान शाखेमध्ये शिकत असलेला पार्थ राकेश माने याने लिमा, पेरू या देशात पार पडलेल्या ज्युनिअर वर्ल्ड चॅमियनशिप २०२४-२५मध्ये १० मीटर एअर रायफल शूटिंग या क्रीडा प्रकारात अमेरिका व चीनला मागे टाकत दोन सुवर्ण पदक प्राप्त केले आहे.

या जागतिक ज्युनिअर नेमबाजी स्पर्धेत दोन सुवर्णपदक प्राप्त करून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. पार्थ पेरू या देशातून नुकताच भारतात परतल्यानंतर त्याने सुवर्णपदकासह महाविद्यालयाच्या प्राचार्यांची भेट घेतली. या वेळी त्याचे भरभरून कौतुक करण्यात आले. ज्युनियर नेमबाजी वर्ल्ड कप स्पर्धेत पार्थ माने यांनी चीन व अमेरिका या देशाच्या स्पर्धकांना मागे टाकत भारताला सुवर्णपदक प्राप्त करून देणे हे जितके भूषणावह आहे, तितकेच महात्मा फुले महाविद्यालयासाठी अभिमानास्पद आहे, असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गणेश ठाकूर यांनी केले.

या वेळी ज्युनिअर महाविद्यालयाच्या सायन्स विभागाच्या इन्चार्ज काटकर मॅडम, कला व वाणिज्य विभागाचे इन्चार्ज डॉ. विशे सर, वर्ग शिक्षिका नावडकर मॅडम, कथारे सर, वानखेडे मॅडम, हरवंदे मॅडम व क्रीडा शिक्षक अक्षय जितेकर यांनी पार्थचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत सीकेटी विद्यालयाचे यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक संचालनालयांतर्गत रायगड जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या सहकार्याने पनवेल महापालिका आयोजित जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धा नुकतीच नवीन पनवेल येथील डॉ. पिल्लई ग्लोबल अकॅडमीत झाली. या स्पर्धेत चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयाने यश मिळवले आहे.

सीकेटी विद्यालयातील विद्यार्थी प्रसाद फडके (बारावी



सायन्स) याने द्वितीय, तर राजवीर सिंग (बारावी सायन्स) याने तृतीय क्रमांक मिळविला. या दोन्ही विद्यार्थ्यांची विभागीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, स्वाती पाटील, तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# राज्य बेंचप्रेस स्पर्धेत नंदिनी उपर, तन्मय पाटील, गणेश तोटे विजेते



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबई वडाळा येथे झालेल्या राज्यस्तरीय बेंचप्रेस क्लासिक स्पर्धेत सब ज्युनिअर मुलींमध्ये नंदिनी उपर बॉडी (लाईन जिम, खोपोली) ही स्ट्राँग वुमन या किताबाची मानकरी झाली, तर ज्युनिअर क्लासिक स्ट्राँग मॅन हा किताब तन्मय पाटील (संसारे जिम) याने प्राप्त केला. सीनिअर इक्विपमध्ये १०५ किलो वजनी गटात गणेश तोटे फिटनेस आणि पनवेल विजेता झाला.

याच पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत रायगडला दोन सांघिक विजेतेपद पुरुष ज्युनिअर आणि महिला ज्युनिअर अशी प्राप्त झाली तसेच क्लासिक स्पर्धेत सीनियर आणि मास्टर पुरुषांचे उपविजेतेपद मिळाले आहे. याबद्दल पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडचे अध्यक्ष गिरीश वेदक यांनी आनंद व्यक्त केला आणि खेळाडूंचे अभिनंदन केले.

या स्पर्धेत रायगड पॉवरलिफ्टिंगचे संघ प्रशिक्षक म्हणून अरुण पाटकर यांची आणि व्यवस्थापक म्हणून सुभाष टेंबे यांची निवड झाली होती. सहाय्यक म्हणून संदीप कृष्णा पाटकर यांना जबाबदारी सांभाळली.

स्पर्धेत रायगडच्या खेळाडूंनी चांगली कामगिरी करून ११ सुवर्ण, १० रौप्य आणि सात कांस्य अशी एकूण २८ पदके प्राप्त केली. या स्पर्धेतून निवडक खेळाडू हे राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या संघात सहभागी होतील. खेळाडूंनी मिळवलेल्या या यशाबाबत त्यांचे प्रशिक्षक मार्गदर्शक यांचासुद्धा महत्त्वाचा वाटा आहे, असे मत संघटनेचे सहसचिव सचिन भालेराव, कार्याध्यक्ष यशवंत मोकल आणि ज्येष्ठ खेळाडू माधव पंडित यांनी व्यक्त केले आहे तसेच दत्तात्रेय मोरे सुभाष भाटे आणि मानस कुंटे यांनीसुद्धा आनंद व्यक्त केला आहे.

# माणगाव क्रिकेट संघाचा नवी मुंबईवर ४८ धावांनी विजय

**माणगाव : प्रतिनिधी**

खारघर येथे झालेल्या एक दिवसीय सामन्यामध्ये फायटर क्रिकेट अकॅडमी माणगाव संघाने चॅम्पियन्स क्रिकेट अकॅडमी नवी मुंबई या संघावर ४८ धावांनी दणदणीत विजय प्राप्त केला.

नाणेफेक जिंकून माणगाव संघाने प्रथम फलंदाजी करीत ४० षटकांत २५९ धावा केल्या. २६० धावांचा पाठलाग करताना खारघर संघाचा डाव २०० धावांवर आटोपला. माणगाव संघाकडून अथर्व खांडेकर यांनी १०१ धावांची नाबाद खेळी केली. लक्की करदेकर यांनी ३५ तर साई भिलारे यांनी ४१ धावांची खेळी केली. गोलंदाजीमध्ये माणगावकडून आरुष जाधव याने चार बळी मिळवले तसेच ऋग्वेद जाधव यांनी दोन तर पार्थ मस्के आणि तेजस मोहिते यांनी प्रत्येकी एक बळी मिळवला. विजयी खेळाडूंचे अभिनंदन होत आहे.



# महाराष्ट्रातील कराटेपटू राष्ट्रीय स्तरावर प्रथम

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पार्वतीबाई चौगुले महाविद्यालय, मडगाव गोवा येथे स्पोर्ट्स चॅम्पियनशिप २०२४चे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये उत्कृष्ट प्रदर्शन करीत महाराष्ट्र राज्यातील मार्शल आर्टचे प्रशिक्षक भूपेंद्र शिवाजी गायकवाड यांच्या एकूण २० खेळाडूंना नऊ सुवर्णपदक व ११ रौप्य पदक मिळाले. त्यामुळे महाराष्ट्र संघाने या स्पर्धेमध्ये पहिल्या क्रमांकाचे चॅम्पियन्स ट्रॉफी पटकावली.

यात सुवर्णपदक विजेते खेळाडू यश मोरे, अविर बनसोडे, स्वरा पिसाळ, वेदांत शेटे, ओम कोठावले, आर्यन



साह, स्वराज पाटील, निशा सरदार, असित इंगळे तर रौप्यपदक विजेते खेळाडूत देवेश नवीन, वृद्धी बिरादार, अक्षया बनसोडे, मीत पाटील, राज शितोळे, हर्षल कुंडलकर, ध्रुव दिघाडे, वेदांत कुडके, श्रेयश मडके, निहार शिंदे, अंश पगार आदींचा समावेश आहे.

विजयी खेळाडू हे पनवेल तालुक्यामधील सीकेटी कॉलेज खांदा कॉलनी, पंचदीप संकुल बालग्राम महाराष्ट्र खांदा कॉलनी व एसएमडीएल महाविद्यालय कळंबोली येथे मार्शल आर्ट प्रशिक्षक भूपेंद्र शिवाजी गायकवाड यांच्याकडे प्रशिक्षण घेत आहेत.







**पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मिडल क्लास सोसायटी मित्र मंडळाच्या वतीने झंकार नवरात्र उत्सव २०२४ आयोजित करण्यात आला आहे. या उत्सवाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देत देवीचे मनोभावे दर्शन घेतले. यंदा झंकार नवरात्रोत्सवाचे हे १९वे वर्ष आहे. तिसऱ्या दिशी उत्तम नृत्य करणाऱ्यांना युवा मोर्चा शहराध्यक्ष सुमित झुंझारराव, संजय भगत, सुहास मुंबईकर, विनायक मुंबईकर, संजय जैन, नीता माळी, नीता मंजुळे यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आले. त्यानंतर चौथ्या दिवशी रविवारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. चे संचालक स्वप्नीलशेठ ठाकूर यांनी सपत्नीक देवीची पुजा केली.**



**पनवेल : मोरबे युवा नेता दिनेश फडके यांना आमदार प्रशांत ठाकूर आणि भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी पळस्पे विभागीय अध्यक्ष अनिश ढवळे, वावंजे येथे विभागीय अध्यक्ष प्रकाश खैरे, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे आदी उपस्थित होते.**





**तळोजा : आदिशक्तीचा जागर मोठ्या उत्साहात सर्वत्र सुरू आहे. नवरात्रोत्सवानिमित्त भाजप व गौरा गणपती महिला मंडल फेज १च्या वतीने विराजमान देवीचे भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी दर्शन घेतले. सोबत आयोजक तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, शुभ पाटील आदी उपस्थित होते.**



**एम. जी. कॉम्प्लेक्स, वाशी**



**वंदे मातरम् नवरात्रोत्सव मंडळ, इनामदार नगर बोरी, उरण**




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com